अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
* कॉन्टूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

उपवासासाठी स्पेशल
टक्कर
मलाई लस्सी
कैलास उडपी। लस्सी
शाखा नं. १ : शिवशक्ती अपार्टमेंट, खिस्त गल्ली, पिराजवळ, अहिल्यानगर.
शाखा नं. २ : तहसील कार्यालया समोर, टीव्ही सेंटर, सावेडी, अहिल्यानगर.
शाखा नं. ३ : पद्मावती पेट्रोल पंपाजवळ, नगर मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. २५.०७.२०२५ | अंक नं. ९९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

रंगीबेरंगी वस्त्रांचं अवघं विश्व..
आशिर्वाद
- लक्ष्मीपती डिझाईनर साडी स्टुडिओ -
गुरु गणेश कॉम्प्लेक्स, माळीवाडा, अहिल्यानगर
फोन : 0241-2425111 / 9260278511
मेनरोड, जामखेड मोबा. : 9420656104 / 9421809421
महा सेल 10% TO 50% DISCOUNT
MAHA SALE १०% ते ५०% पर्यंत सूट
मनसोक्त खरेदीचं परफेक्ट डेस्टीनेशन
10% ते 50% पर्यंत डिस्काऊंट
ब्रॅन्डेड सारीज । डिझाईनर सारीज । टॉप्स कुर्तीज । ड्रेस मटेरियल
Conditions Apply*

# शहरासह जिल्ह्यात ना कायद्याचा धाक, ना पोलिसांची भीती

नगर - नगर शहरासह जिल्ह्यात दररोजच चोऱ्या, घरफोड्या, लुटमारीच्या घटना घडतच आहेत, त्यावर नियंत्रण मिळविण्यास पोलिस यंत्रणा अपयशी ठरत आहे. हे प्रकार एकीकडे सुरु असताना दुसरीकडे हाणामाऱ्या, खुन, खुनाचा प्रयत्न या घटनाही वाढत आहेत. दररोजच एकमेकांवर लाठ्या, काठ्या, कोयते, तलवारी सारख्या हत्यारांनी वार केले जात आहेत. कोणीही उठून भाईगिरी करत असल्याचे चित्र आहे, त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यात ना कायद्याचा धाक, ना पोलिसांची भीती... अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे.

नगर शहरात २४ जुलै रोजी दुपारच्या वेळी अतिशय गंभीर घटना घडली. दिल्लीगेट परिसरातील म्युन्सिपल कॉलनीत दोन गटांत राडा झाला. यात लाकडी दांडके, तलवारींचा वापर करण्यात आला. ऑफीससह वाहनांची तोडफोड करण्यात आली. यात महिलांसह तरूण जखमी झाले आहेत. पूर्ववैमनस्यातून हा वाद झाल्याचे सांगितले जात आहे. यावेळी जमावाकडून दुकानावरही दगडफेक करण्यात आली. सदरची घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. तसेच काहींनी मोबाईलमध्ये या घटनेचे व्हिडीओ काढले, ते सोशल मिडीयावर व्हायरलही झाले आहेत. हे हाणामारीचे व्हिडीओ पाहिल्यावर यात जे लोकं हाणामारी करत आहेत, त्यांना पोलिसांची किंवा कायद्याची कुठलीच भीती वाटत नसल्याचे दिसत आहे.

म्युन्सिपल कॉलनीतील या दोन गटात यापूर्वी अनेकदा असे वाद झालेले आहेत. अनेकदा एकमेकांवर खुनी हल्ले करण्यात आलेले आहेत. प्रत्येक वेळी पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल झाले. मात्र पोलिसांनी कडक कारवाई केली नसल्याने 'सब कुछ मॅनेज होता है' असाच या समज झालेला असावा, त्यामुळेच वारंवार असे प्रकार घडत आहेत. त्यांच्यात एवढी डेअरिंग कशामुळे आली, पोलिस करतात काय? यात एखाद्याचा खून झाल्यावर पोलिसांना जाग येणार का? असे अनेक सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहेत.

हिच परिस्थिती शहरात सर्वत्र पहावयास मिळत आहे. दररोज कुठे ना कुठे कोणावर तरी तलवारीने, कोयत्याने, लोखंडी रॉड किंवा लाकडी दांडक्यांनी हल्ले होत आहेत. गावठी कट्टे तर अनेकांकडे आढळून येत आहेत. अल्पवयीन मुलेसुद्धा यात मागे राहिलेले नाहीत. नुकतीच शहरातील सीताराम सारडा विद्यालयातील विद्यार्थ्याच्या खुनाची घटना घडलेली आहे. काही दिवसांपूर्वी तपोवन रस्त्यावरून एका तरुणाचे अपहरण करून त्याचा एमआयडीसी परिसरात खून केला आणि मृतदेह केकताई जंगलात नेवून जाळून टाकल्याची घटनाही घडलेली आहे. अशा प्रकारचे गुन्हे करण्याचे धाडस या गुन्हेगारांमध्ये कुठून येते, याचे आत्मपरीक्षण पोलिस यंत्रणेने करण्याची गरज निर्माण झाली आहे. कारण जेव्हा कायद्याचा आणि पोलिसांचा धाक राहत नाही, तेव्हाच असे हल्ले किंवा गुन्हे करण्याचे धाडस गुन्हेगारांमध्ये येत असते.

## दररोजच चालताहेत लाठ्या, काठ्या, कोयते, तलवारी; कोणीही उठून करतोयं भाईगिरी

### गामा भागानगरे खून प्रकरणापासून काही धडा घेतला की नाही?

नगर शहरात तोफखाना पोलिस ठाण्याच्या हद्दीतच बालिकाश्रम रोडवर दोन वर्षांपूर्वी १९ जून २०२३ रोजी रात्री ओंकार उर्फ गामा भागानगरे याचा तलवारीने वार करून खून करण्यात आला होता. कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीत सुरु असलेल्या अवैध धंद्यांची माहिती पोलिसांना दिल्याच्या कारणावरून हा खून झाल्याचे त्यावेळी फिर्यादीत नमूद करण्यात आले होते. मात्र या मागील कारण वेगळेच होते. दोन गटात कायमच कुरबुरी सुरु होत्या, प्रकरण पोलिसांपर्यंत जायचे पण पोलिसांनी कधीच ठोस कारवाई केली नाही, या उलट 'तुम भी खावो, हमे भी खिलाओ' अशी भूमिका घेतल्याने पुढे हे सर्व हत्याकांड घडले. फिर्यादीत नमूद केल्यानुसार गामा भागानगरे याने जर अवैध धंद्यांची माहिती पोलिसांना दिली होती तर हे आरोपींना कसे कळले, कोणी सांगितले? याचा तपास व्हायला पाहिजे होता पण तो अद्याप झालेला नाही.

### पोलिसांबरोबरच राजकारणीही घालतात गुन्हेगारीला खतपाणी

भागानगरे हत्याकांडानंतरही शहरात अनेक खून आणि खुनाचे प्रयत्न झाले. त्यातील बरेच गुन्हे हे टोळी युद्धामुळे झालेले आहेत. एखाद्या गुन्हेगाराला तो लहान असतानाच धाक बसवण्याऐवजी पोलीसच त्याला संरक्षण देतात. कधी पैशांमुळे, कधी ओळखीमुळे व अनेकदा राजकीय वरदहस्तामुळे असे संरक्षण मिळते व लहान गुन्हेगाराचा बघता बघता 'भाई' होतो. त्याच्या गुन्हेगारी कारवायांना आळा घालणे मग पोलीसांच्या आवाक्याबाहेर जाते. मग तेच त्याच्याशी जुळवून घेतात व त्याला आणखी मोठा करतात. गुन्हेगारांना आश्रय देत पावन करून घेणारे राजकारणीही याला तेवढेच जबाबदार आहेत.

### विश्वास नांगरे पाटील, कृष्णप्रकाश यांची होतेयं अहिल्यानगरकरांना आठवण

नगरमध्ये साधारण २० वर्षांपूर्वी विश्वास नांगरे पाटील आणि त्यानंतर १५ वर्षांपूर्वी कृष्णप्रकाश हे पोलिस अधिक्षक म्हणून आले होते. त्यांच्या काळात शहरातील राजकीय तसेच सर्वच प्रकारची गुन्हेगारी आटोक्यात आली होती. खुद्द पोलीसांनाही नांगरे पाटील व कृष्णप्रकाश यांचा धाक होता. ते गेल्यानंतर मात्र पुन्हा गुन्हेगारी वाढली आहे, पोलीसही मोकळे झाले आहेत. सर्व प्रकारचे अवैध धंदे शहरात खुलेआम सुरू असतानाही पोलीसांना मात्र ते दिसतही नाहीत. त्या सर्वांना खुली मोकळीक व सर्वसामान्य नागरिक, व्यापारी यांच्यावर धाकदडपशाही, असा कारभार सध्या सुरु असल्याने नगरकरांना आजही विश्वास नांगरे पाटील आणि कृष्णप्रकाश यांची प्रकर्षाने आठवण होत आहे.

### जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी 'रियल सिंघम'ची भूमिका वठविण्याची आवश्यकता

अभिनेता अजय देवगण याच्या सिंघम या चित्रपटाने पोलिसांची जनमानसातील प्रतिमा उंचावली गेली होती. त्यामुळे पोलिस दलातील एखाद्या अधिकाऱ्याने खमकी भूमिका घेत गुन्हेगारांवर वचक निर्माण केला तर तर त्याला रियल मधला 'सिंघम' अशी उपाधी जनताच देत असते. जिल्ह्यात दीड दोन महिन्यांपूर्वी रुजू झालेले पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी या कालावधीत अवैध धंद्यांच्या विरोधात मोहीम सुरु केलेली आहे. विशेषत: जिल्ह्यात सर्रास विकला जाणारा, गुटखा, पानमसाला, सुगंधी तंबाखूपासून तयार केलेला मावा आता मिळेनासा झाला आहे. शहरातील अनेक माव्यांच्या टपऱ्यांना टाळे लागले आहे. त्यानंतर त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील लाचखोर पोलिस उपनिरीक्षक आणि तीन कर्मचारी यांना निलंबित केलेले आहे. त्यामुळे त्यांची प्रतिमा जनमानसात उजळू लागली आहे. मात्र हे नव्याचे नऊ दिवस ठरू नयेत. त्यांनी गुन्हेगारांवर कायद्याचा वचक निर्माण होण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात आणि जनमानसात रियल 'सिंघम' ची प्रतिमा तयार करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# शालेय विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या वाहनांमध्ये सीसीटीव्ही कार्यान्वित करा

## वाहनांवर अत्यावश्यक दूरध्वनी क्रमांक स्पष्टपणे लिहावा : पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या सूचना

नगर - शालेय विद्यार्थ्यांची ने-आण करणारी बस व वाहने सुरक्षित असावीत, यासाठी प्रत्येक वाहनामध्ये सीसीटीव्ही कार्यान्वित करण्याच्या सूचना जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिल्या.

पोलीस अधीक्षक कार्यालयात नुकतीच जिल्हा शालेय बस सुरक्षितता समितीची बैठक पार पडली. यावेळी श्री. घार्गे बोलत होते. बैठकीस महापालिकेचे उपायुक्त विजय मुंडे, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनंता जोशी, पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे, चंद्रकांत खेमनर आदी उपस्थित होते.

श्री. घार्गे म्हणाले की, प्रत्येक शालेय बस किंवा वाहनांमध्ये सीसीटीव्हीची सुविधा कार्यान्वित करण्यात यावी. ६ वर्षांखालील विद्यार्थ्यांच्या ने-आणसाठी बस किंवा वाहनांमध्ये महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी. शालेय बस किंवा वाहनांवर अत्यावश्यक दूरध्वनी क्रमांक स्पष्टपणे लिहावा.

अवैध वाहतुकीविरोधात संबंधित विभागांनी संयुक्तपणे मोहिम राबवून दोषी वाहनांवर तातडीने कारवाई करावी. विद्यार्थ्यांची चढ-उतार फक्त शाळेच्या पार्किंगमध्येच सुरक्षितपणे होईल, यासाठी सर्व बसेस तिथेच उभ्या कराव्यात. रस्त्यावर धोकादायक पद्धतीने चढ-उतार करू नये.

प्रत्येक शाळेच्या व्यवस्थापनाने जबाबदार व्यक्तीची नियुक्ती करावी. तसेच सर्व शाळांनी परिवहन समितीच्या बैठका नियमित घेण्याच्या सूचनाही या बैठकीत देण्यात आल्या.



पोलीस अधीक्षक कार्यालयात जिल्हा शालेय बस सुरक्षितता समितीची बैठक पार पडली. याप्रसंगी नियमावलीचे सूचनापत्र पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिले. यावेळी विजय मुंडे, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे आदी.

डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* डोकेदुखी, मायग्रेन * फिटचे आजार, अपस्मार
* हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
* तोल जाणे * व्हर्टिगो, चक्कर येणे * अर्धांगवायू, पॅरेलीसीस * विसराळूपणा * थरथर सुटणे, पार्किन्सन
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999

Plasto Gold
6 Layer, 8 Layer
Water Storage Tank
Rust Proof & Leak Proof
Anti Bacteria
10 Year Gurantee
100% UV Protection
Safe for Drinking Water
100% Virgin Plastic & Food-Grade Material
One Piece Blow Moulded Tank
Availabe Size in 500 L, 750 L, 1000 L, 1500 L, 2000 L
अधिकृत विक्रेते!
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES
CORPORATION & HARDWARE

लेडिज व जेन्टसचे शर्ट, टि-शर्ट. नाईट पँट, ट्राऊजर्स, फॅरमल पॅन्टस्
महिलांसाठी - साडी, कुर्ती, वनपिस, टॉप, कप्पान
तसेच लहान मुलांचे कपडे
भरपूर व्हरायटीज् | काहीही घ्या | मर्यादित स्टॉक
₹ 500 मध्ये तीन
ब्रॅण्डेड शर्ट ₹ 1000 मध्ये चार
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
मयुरी लेडिज मॉल

CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
COURSE DETAILS
TAXATION, BANKING | COMPUTER APPLICATION | AUDITING | ADVANCE ACCOUNTING
CAA 100% JOB ASSISTANCE
IS NOT JUST A COURSE BUT A GREAT INVESTMENT IN YOUR CAREER
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate. 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road. 9371151769
Pipeline Branch: Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road. 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# घरातून चोरी; रोकड, सोन्याच्या दागिन्यांसह दहा लाखांचा ऐवज चोरट्यांनी केला लंपास

नगर – बंद घराच्या दरवाजाचे कुलूप उघडून अज्ञात चोरट्याने घरातील सोन्याचे दागिने रोख रक्कम असा सुमारे १० लाख रुपये किमतीचा ऐवज चोरुन नेला. ही घटना नगर तालुक्यातील बहिरवाडी येथे १८ जुलै ते २३ जुलै दरम्यान घडली.

याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात नंदू बलभीम दारकुंडे (वय ४९, रा. बहिरवाडी, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे औषधोउपचाराकरिता कोल्हापूर येथे १८ जुलै रोजी गेले होते. त्यांच्या घरी त्यांची आई व आजी या दोघी होत्या. फिर्यादी यांची आई व आजी घरातील काम उरकून घराला कुलूप लावून घराची चावी घराजवळच असलेल्या त्यांच्या नेहमीच्या ठिकाणी ठेवून शेतात गेल्या. तिथून परत आल्यानंतर फिर्यादी यांच्या आईने दरवाजा उघडण्याकरिता चावी घेतली असता ती चावी थोडी वाकडी झालेली त्यांच्या निदर्शनास आली. त्यावर त्यांनी घराचे कुलूप उघडून आत प्रवेश केला असता घरातील सर्व साहित्य व्यवस्थित ठेवलेले दिसून आले. फिर्यादी हे कोल्हापूर येथून परत आल्यानंतर कपाटात पैसे ठेवण्याकरता गेले असता त्यांनी कपाट उघडून पाहिले असता आतील सर्व साहित्य व्यवस्थित ठेवलेले दिसून आले. परंतु त्यांनी ठेवलेले पैसे त्यांना दिसून आले नाही त्यावर त्यांनी घरात सगळ्याकडे चौकशी केली असता त्याबाबत कोणाला काही माहित नसल्याचे सर्वांनी सांगितले. फिर्यादी यांनी कपाटाची पाहणी केली असता त्यांना आतील सोन्याची दागिण्याचे बॉक्स मोकळे असलेले दिसून आले. त्यांनी कपाटातील सर्व बॉक्सची पाहणी केली असता बॉक्समधील ५ तोळे ५ ग्रॅम वजनाचे चेन चे मंगळसूत्र, २२.६ ग्रॅम वजनाचे नेकलेस व ४ लाख ५० हजार रुपयांची रोख रक्कम दिसून आली नाही. यावरुन घरात चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

घराच्या दरवाजाला कुलूप लावल्यानंतर चावी ठेवलेल्या ठिकाणावरुन कोणीतरी माहितगार व्यक्तीने तिथून चावी घेऊन घराचे कुलूप उघडून आतील कपाटातील बॉक्स मधील दागिने व रोख रक्कम चोरून घेऊन सर्व साहित्य जसेच्या तसे व्यवस्थित ठेवून चोरी केली असल्याची त्यांची खात्री झाली.

याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात नंदू दारकुंडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस कलम ३०३ (२) अन्वये घरफोडीचा चोरीचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मोंढे हे करीत आहेत.

## प्रेरणादायी अक्षरधन...

### राज्यकर्त्यांनी दारु रोखण्याचे धोरण घ्यावे

आदर्श सामाजिक अभ्यासक आणि राज्याच्या 'दारू व तंबाखूवरील टास्क फोर्स'चे सल्लागार डॉ. अभयजी बंग यांनी दारुवर भाष्य सांगितलयं.



महाराष्ट्रात १९७० पर्यंत दारुबंदी होती. ती शिथील झाली. दारुचे उत्पादन, खप, सेवन व कर यात वाढ करत राहणे ही शासकीय दिशा राहिली आहे. पण यातूनच काही गंभीर प्रश्न उभे राहिले आहेत.

लाडकी बहिण सारख्या योजनांचा भार हलका करण्यासाठी व सहज–सोपे उत्पन्न मिळवण्यासाठी (महसूल व?) दारुवरील कर वाढवले जातात. सध्या दारुचे उत्पन्न व उत्पादन वाढवण्यासाठी महाराष्ट्र सरकार उत्तरप्रदेश मॉडेलचे अनुकरण करीत आहे. खरे तर दारु हे रोग, मृत्यू (व गरिबीचे) यांचे मोठे कारण आहे व तिचे नियंत्रण आवश्यक आहे. अशी शिफारस आधुनिक आरोग्य विज्ञान करते.

म्हणूनच राज्यातील दारुचा खप व व्यसन उत्तरोत्तर कमी कसे होईल असे महाधोरण आखायला हवे. भारतात गुजरात, बिहार, मिझोराम व नागालँड या ४ राज्यात दारुबंदी आहे. अमेरिकन तज्ञांनी या राज्यांतील बंदी परिणामांचा अभ्यास करुन अमेरिकन इकॉनॉमिक रिव्ह्यूमध्ये शोधनिबंध लिहिला आहे. राज्यशासनाने दारुबंदी केली तर राज्यातील दारुचे सेवन ४०% कमी होते व स्त्रियांवरील अत्याचार, हिंसा यांच्या घटना एक लाख लोकसंख्येमागे ४००० ने कमी होतात असे निष्कर्ष काढले आहेत. याशिवाय इतर पूरक उपाय हाती घेतले तर या परिणामांचा परीघ विस्तारता येतो.

गडचिरोली जिल्ह्यात १९९३ पासून दारुविक्री बंदी आहे. आदिवासींना घरगुती व सामूहिक दारु वापराची मुभा आहे. 'मुक्तीपथ' कार्यक्रमांखाली तेथील दारुचे प्रमाण ३३ टक्क्यांनी कमी करणे शक्य झाले आहे. एकूण काय तर १० वर्षात महाराष्ट्रातील दारुचे सेवन ५०% कमी करण्यासाठी राज्य सरकारने प्रयत्न करायला हवेत. दरवर्षी दारु वरील कर पाच टक्क्यांनी वाढवला तर उत्पन्नावर परिणाम होणार नाही. या सगळ्या प्रयत्नांसाठी सरकारने महाधोरण तयार करायला हवे.

# नेप्ती मार्केटमध्ये कांदा व्यापाऱ्याची २६ लाख ४१ हजारांची फसवणूक

### परप्रांतीय पाच व्यापाऱ्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – नगर बाजार समितीच्या नेप्ती कांदा मार्केट मधील व्यापाऱ्याकडून ट्रान्सपोर्ट द्वारे कांदा खरेदी करुन कांदा खरेदी मालाचे २६ लाख ४१ हजार ३७९ रुपये न देता व्यापाऱ्याची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात २४ जुलै रोजी ५ जणांविरुद्ध फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कांदा व्यापारी राहुल रामदास आंधळे (वय ३१, रा. पारिजात कॉर्नर, गुलमोहर रोड, सावेडी, अ.नगर) यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. फिर्यादी यांचा केडगाव परिसरातील नेप्ती मार्केट येथे कांदा विक्रीचा व्यवसाय आहे. फिर्यादी यांच्याकडून ४ जानेवारी २०२० ते ९ मार्च २०२० दरम्यान मोहम्मद नदिम (पूर्ण नाव माहित नाही. रा. सब्जीमंडी, पिलीभित, उत्तर प्रदेश) अरिफ रजा, मोहम्मद युनूस ॲण्ड कंपनी, मोहम्मद हसीन, छोटे मिया ॲण्ड कंपनी (राहणार माहित नाही) यांनी ट्रान्सपोर्टद्वारे वेळोवेळी कांदा खरेदी केला. या कांद्याची रक्कम त्यांनी फिर्यादी यास दिली नाही. वेळोवेळी पैशाची मागणी केली असता त्यांनी फिर्यादी यांना उडवाउडवीचे उत्तरे दिली व पैसे देण्यासही नकार दिला. याप्रकरणी फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्यावर फिर्यादी यांनी पैसे मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. परंतु त्यांना यश आले नाही.

त्यामुळे त्यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरुन पाच जणांविरुद्ध भारतीय दंड विधान कायदा कलम ४२०, ४०६, ४०९, ३४ प्रमाणे फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढील तपास सहाय्यक फौजदार रवींद्र डावखर हे करीत आहेत.

# अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेस 'कै. वैकुंठभाई मेहता उत्कृष्ट पुरस्कार'

नगर – दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशनकडून राज्यातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्हा मध्यवर्ती बँकामध्ये अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस 'कै. वैकुंठभाईमेहता उत्कृष्ट जिल्हा सहकारी बँक पुरस्कार' सहकार राज्य मंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते बँकेचे व्हाईस चेअरमन ॲड. माधवराव कानवडे, संचालिका श्रीमती गितांजलीताई शेळके, संचालक अंबादास पिसाळ तसेच कर्जत मार्केट कमिटी सभापती काकासाहेब तापकीर व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रायसाहेब वर्पे तसेच बँकेचे वरिष्ठ अधिकारी यांनी मुंबई येथे यशवंतराव यशवंतराय चव्हाण सेंटरच्या सभागृह मध्ये २३ जुलै रोजी समारंभ पुर्वक स्विकारला.



अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस 'कै. वैकुंठभाईमेहता उत्कृष्ट जिल्हा सहकारी बँक पुरस्कार' सहकार राज्य मंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते स्विकारताना बँकेचे व्हाईस चेअरमन ॲड. माधवराव कानवडे आदी.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून कोकण महसुल आयुक्त विजय सुर्यवंशी उपस्थित होते. तसेच माजी मंत्री शोभाताई फडणवीस, रायगड जिल्हा बँकेचे चेअरमन जयंत पाटील, अकोले जिल्हा बँकेचे चेअरमन डॉ. संतोषकुमार कोरपे, जिजामाता महिला बँकेच्या माजी अध्यक्षा श्रीमती जिजाताई शिरोळे, असोसिएशनचे अध्यक्ष भाऊ कड, उपाध्यक्ष प्रचिन पोरेड्डीवार, बँकींग क्षेत्रातील नेते विश्वासराव ठाकुर, बँकेचे अधिकारी सुरेश पाटील, भारत सोले पाटील, शैलेश बोधले, दिलीप पठारे, बाबासाहेब शिंदे तसेच राज्यातील पुरस्कार प्राप्त व्यक्ती व सहकारी बँकांचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक, एमडी/सीईओ उपस्थित होते.

### जिल्हा बँक ही कामधेनू संस्था : शिवाजीराव कर्डिले

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन आमदार शिवाजीराव कर्डिले म्हणाले की, अहमदनगर जिल्हा बँकेस पुरोगामी नेतृत्व लाभले असून जिल्हा बँक ही जिल्ह्याची कामधेनू संस्था म्हणून ओळखली जाते. बदलत्या काळात जिल्हा बँकेने नवीन तंत्रज्ञान स्विकारुन राज्यात तंत्रज्ञानामध्ये अहमदनगर जिल्हा बँक आघाडीवर आहे. शेती व शेतीपुरक व्यवसाय, सहकारी साखर कारखाने व इतर सहकारी संस्थांना बँकेने नेहमीच पाठबळ दिले आहे. यामुळे बँकेची उत्तोरोत्तर प्रगती होत असल्याने नाबार्ड सह अनेक संस्थांकडून बँकेस विविध पुरस्कार देवून बँकेचा सन्मान व गौरव होत आहे. यामध्ये बँकेचे ठेवीदार, कर्जदार, शेतकरी बांधव, सभासद सहकारी संस्था, बँकेचे अधिकारी, कर्मचारी आणि संचालक मंडळ यांचा वाटा आहे.



# नगरमध्ये २८ जुलै रोजी रेड रन स्पर्धेचे आयोजन

नगर – आंतरराष्ट्रीय युवा दिवस दरवर्षी १२ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. या अनुषंगाने २८ जुलै रोजी सकाळी ७.३० वाजता जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथे रेड रन स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे यांनी दिली.

युवावर्गामध्ये एचआयव्ही/एड्सविषयी जागरूकता निर्माण होणे आवश्यक आहे. या उद्देशाने महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेतर्फे विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून १८ ते २१ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी रेड रन उपक्रम राबविण्यात येणार आहे.

२८ जुलै रोजी सकाळी ७.३० वाजता रेड रन स्पर्धेला जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथून सुरुवात होईल. स्पर्धा पत्रकार चौक – प्रेमदान चौक – सावेडी नाका – डीमार्ट चौक मार्गे वळसा घेऊन पुन्हा जिल्हा रुग्णालयात समाप्त होणार आहे.

या स्पर्धेत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. घोगरे यांनी केले आहे.

# माळीवाडा बसस्थानकातून वृद्ध महिलेचे दागिने पळविले

नगर – एसटी बसने प्रवास करण्यासाठी गर्दीतून आत प्रवेश करणाऱ्या ७० वर्षीय महिलेच्या गळ्यातील ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे डोरले अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेत चोरुन नेले. ही घटना शहरातील माळीवाडा बसस्थानकात २४ जुलै रोजी सकाळी १० ते १०.३० वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत मंदाबाई गंगाधर क्षिरसागर (वय ७०, रा. केशवगोविंद गल्ली, बेलापूर, ता.श्रीरामपूर, जि. अ.नगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या पूनम अविनाश डोळस यांच्यासोबत देवदर्शनासाठी मायंबा सावरगाव येथे निघाल्या होत्या. सकाळी ७ वाजता बेलापूरहून निघून त्या माळीवाडा बसस्थानक येथे पोहोचल्या. सकाळी १० वाजता मायंबा सावरगावकडे जाणारी एसटी बस आल्यानंतर त्या दोघीनी बसमध्ये बसण्यासाठी प्रवाशांच्या गर्दीतून बसमध्ये आत प्रवेश केला. बसमध्ये प्रचंड गर्दी असताना काही क्षणांतच त्यांना गळ्यातील सोन्याचे डोरले गायब झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. लगेचच त्यांनी बसमधून खाली उतरुन परिसरात शोधाशोध केली, मात्र डोरले कोठेही सापडले नाही. यावरुन त्यांची खात्री झाली की त्यांच्या गळ्यातील सोन्याचे डोरले कोणीतरी चोरुन नेले. त्यामुळे फिर्यादी या पुनम डोळससह तक्रार देण्यासाठी कोतवाली पोलीस ठाण्यात गेल्या. याप्रकरणी कोतवाली पोलीसांनी मंदाबाई क्षीरसागर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार संदीप पितळे हे करीत आहेत.

# किरकोळ वादातून वृद्ध व्यक्तीवर केले सत्तुरने वार

### निलक्रांती चौकातील घटना, तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – किरकोळ वादाचा मनात राग धरुन सत्तुराने वार करुन एका ६० वर्षीय व्यक्तीला जखमी करुन तिघांनी शिवीगाळ, दमदाटी केल्याची घटना निलक्रांती चौक, बालिकाश्रम रोड येथे वॉशिंग सेंटर दुकानासमोर २४ जुलै रोजी घडली आहे.

याबाबत दिलीप छबू पारधे (वय ६०, रा. निलक्रांती चौक, बालिकाश्रम रोड) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादी यांचे २३ जुलै रोजी यश राजेंद्र मकासरे याच्यासोबत किरकोळ वाद झाला होता. त्याचा राग मनात ठेवून दुसऱ्या दिवशी म्हणजेच २४ जुलै रोजी दुपारी साडेचार वाजता, यश मकासरे, त्याचे वडील राजेंद्र रत्नाकर मकासरे आणि त्यांचा साथीदार तुषार भोसले (सर्व रा. बालिकाश्रम रोड) हे तिघेही फिर्यादी यांच्या वॉशिंग सेंटरसमोर आले. त्यांनी तुमचा पुतण्या स्वप्नील कोठे आहे? असे विचारुन वाद सुरु केला. फिर्यादी यांनी तो येथे नाही असे सांगताच, संतप्त झालेल्या यश मकासरे याने त्याच्या ॲक्सेस गाडीच्या डिक्कीतून सत्तुर काढून फिर्यादी यांच्या दोन्ही हातांवर वार केले. यामध्ये त्यांच्या बोटांना गंभीर जखमा झाल्या आहेत. हल्लयानंतर तिघांनी मिळून शिवीगाळ करीत जिवे मारण्याची धमकी दिली. यानंतर जखमी फिर्यादी यांनी तत्काळ सिव्हील हॉस्पिटल येथे जाऊन उपचार घेतले व नंतर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात दिलीप पारधे यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन तिघांविरोधात शिवीगाळ, मारहाण व जिवे मारण्याच्या धमकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सहायक फौजदार गोर्डे हे करीत आहेत.

# करनिर्धारण कायद्यात सागर ससाणे यांना डिप्लोमा पदवी प्राप्त



नगर – श्नायडर इलेक्ट्रिक कंपनीत गेल्या १७ वर्षांपासून कार्यरत असलेले सागर ससाणे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि न्यूलॉ कॉलेज, अहिल्यानगर येथून करनिर्धारण कायद्यात (Diploma in Taxation Law - DTL) यशस्वीपणे पदवी प्राप्त केली आहे.

सागर ससाणे हे सध्या व्यवस्थापक कार्यरत असून त्यांनी याआधी इंजिनिअरिंगमधील पदव्युत्तर शिक्षण, MBA, DLLLW, आणि सायबर कायद्यातील डिप्लोमा पूर्ण केले आहेत. त्यांचा शैक्षणिक प्रवास पुढीलप्रमाणे आहे: BE (Mechanical), ME (Mechanical), DME, MBA (Operations), BA (Logistics), PGDFSE (Fire Safety), DLL LAW, DCL (Cyber Law) त्यांनी कंपनीमध्ये कार्य करत असताना QCFI आणि CII या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये अनेक सुवर्णपदक पटकावली आहेत.

या यशाबद्दल प्लांट हेड अमित लाखे (जनरल मॅनेजर), विभागप्रमुख नाईकवाडी सर, HR हेड कुलकर्णी सर, गाडे सर, आणि रुपेश सर यांनी त्यांचे कौतुक केले आहे.

### रामचंद्र आंबेकर यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – येथील माळीवाडा परिसरातील विशाल गणेश मंदिराजवळील रहिवासी रामचंद्र धोंडीराम आंबेकर (वय ९२) यांचे २४ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे सुना, नातवंडे, पुतणे असा परिवार आहे. ते राहुल आंबेकर, रोहित आंबेकर, अतुल आंबेकर यांचे आजोबा होत.

### भास्कर कांडके यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – गणेशवाडी कौडगाव येथील रहिवासी भास्कर भाऊ कांडके (वय ८८) यांचे २५ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर कौडगाव येथील कांडके वस्तीवर अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, ३ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. विजय व बबन कांडके यांचे ते वडील होत.

### सौ. कलावती आरखडे यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर – येथील सौ.कलावती शंकर आरखडे (वय ७२) यांचे २४ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले.



त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. मोरगेवस्ती, श्रीरामपूर येथील रहिवासी शंकर आरखडे यांच्या पत्नी, प्रकाश आरखडे व संजय आरखडे यांच्या मातोश्री होत.

# आचार्यश्रींची मानवसेवेची शिकवण सर्वांसाठी प्रेरणास्त्रोत

### डॉ.अनुपमाजी म.सा. यांचे प्रतिपादन; आचार्यश्रींच्या १२५ व्या जन्मजयंतीनिमित्त आनंदधाम येथे तेला तप व भव्य आयंबिल कार्यक्रम उत्साहात

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांचा १२५ जन्मोत्सव आनंदधाम येथे उत्साहात साजरा करण्यात आला. गुरुवारी सकाळी ८.३० ते ९ यावेळेत सहजोडा जाप कार्यक्रम झाला. शुक्रवारी सकाळी गुरु गुण गौरव कार्यक्रम झाला व गुरु कमल चरणची विधीवत पूजा करण्यात आली. तेला तप आराधना, एकासन, अठाई उपवास करण्यात आले. मुकेश मुथियान यांनी ३१ दिवसांचे उपवास करून आचार्यश्रींच्या स्मृतीला अभिवादन केले. केशरगुलाब मंगल कार्यालयात भव्य आयंबिल झाले.



आचार्यश्रींच्या जन्मजयंतीनिमित्त आनंदधाम येथे तेला तप व भव्य आयंबिल कार्यक्रम उत्साहात झाला.

महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषिजी म.सा., आलोकऋषीजी म.सा., वात्सल्य मूर्ती डॉ. दर्शनप्रभाजी म.सा., विदुषी डॉ. अनुपमाजी म. सा., आगरकर मळा जैन स्थानकात चातुर्मासानिमित्त उपस्थित अनुप्रेक्षाजी म.सा. आदी ठाणा इत्यादी साधु साध्वीजींच्या पावन सानिध्यात आचार्यश्रींच्या जन्मजयंतीचे विविध कार्यक्रम झाले. यात गुरु कमल चरण पूजा करण्यात आली. डॉ.अनुपमाजी म.सा. यांनी आचार्यश्रींच्या जीवन कार्यावर प्रवचन दिले. त्या म्हणाल्या की, आचार्य आनंदऋषीजी महाराज यांनी वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी दीक्षा घेतली. धर्माचरणाचा वस्तुपाठ त्यांनी घालून दिला. मानवता धर्मच सर्वश्रेष्ठ ही त्यांची शिकवण आताच्या काळात सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. आनंदधामचा परिसर त्यांच्या पदस्पर्शाने पुनित झालेला आहे. या पवित्र ठिकाणी त्यांची जन्मजयंती साजरी करण्यासाठी हजारो श्रावक श्राविका उपस्थित राहिल्या हे पाहून मनाला खूप आनंद होतो. पूज्य गुरुदेवांच अलौकिक कार्य येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी दीपस्तंभासारखे मार्गदर्शक राहिल.

याप्रसंगी जैन श्रावक संघाचे सेक्रेटरी संतोष बोथरा, उपाध्यक्ष आनंदराम मुनोत, सतीश लोढा, संतोष गांधी, अभय लुणिया, मनिषा मुनोत आदी उपस्थित होते.

स्वागत करताना संतोष बोथरा म्हणाले, आचार्यश्रींनी देशभरात धर्म प्रभावना करून मानवतेची शिकवण दिली. त्यांच्या महान कार्यातून प्रत्येकालाच सकारात्मक ऊर्जा मिळते. त्यांच्या विचारातूनच अनेक समाज उपयोगी उपक्रम राबविण्याची प्रेरणा मिळते. आचार्यश्रींवर नितांत श्रध्दा असल्याने आज देशभरातील भाविक आवर्जून आनंदधाम येथे आले. आचार्यश्री कायम सर्वांचा मोठा प्रेरणास्त्रोत आहेत.

आचार्यश्रींच्या जन्म जयंतीनिमित्त भाविकांनी आयंबिल, तेला (तीन उपवास), एकासना (एक उपवास), अठ्ठाई (आठ उपवास) असे उपवास करून आचार्यश्रींप्रति भक्ती दर्शवली. या भाविकांचे उपस्थितांनी कौतुक केले.

कार्यक्रमानंतर सर्वांसाठी भक्त निवास येथे गौतम प्रसादीची व्यवस्था करण्यात आली होती. आचार्यश्रींच्या ध्वनीमुद्रीत मंगल पाठाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# गृहिणी

## आरोग्य

### जंकफूड धोकादायक

जंकफूड हे हृदयासाठी धोकादायक आहे. जास्त तळलेले, भाजलेले पदार्थ खाणंही आरोग्यासाठी नुकसानकारक आहे. जे हृदयासाठी धोकादायक आहे. मुख्यत्वे कर्बोदके व फॅटस्चे प्रमाण बरेच जास्त असते. या अन्नावर खूप जास्त प्रक्रिया केलेली असल्या मुळे त्यामध्ये आरोग्यासाठी नुकसानकारक असे अनेक विषारी घटकसुद्धा तयार होतात. पदार्थ ताजे दिसावेत, जास्त काळ टिकावेत म्हणून त्यावर केल्या जाणाऱ्या अनेकविध प्रक्रिया आणि वापरली जाणारी प्रिझर्वेटिव्हस यामुळे ते आरोग्यासाठी आणखीन हानिकारक ठरतात. अधिक तळलेले पदार्थ, मैद्यापासून तयार होणारे बेकरी उत्पादित पदार्थ, चाट तसेच पदार्थ, पिझ्झा-बर्गर, नूडल्स या पदार्थांचा समावेश 'जंक फूड'मध्ये होतो.

## पाककला

### फाफडी

**साहित्य** - तांदूळ पिढी २ वाट्या, बेसन १ वाटी, मीठ, तिखट, जिरे पूड व ओवा पूड प्रत्येकी अर्धा टी स्पून, मोहन १ टे. स्पून, तळणीस तेल.

**कृति** - तळणीचे तेल सोडून सर्व जिन्नस एकत्र करा. घट्ट मळा. एकीकडे तेल तापत ठेवा. पोळपाटावर पातळ पोळी लाटा. सुरीने तिच्या उभ्या पट्ट्या कापा व गरम तेलात तळा. फाफडा आपण चहा बरोबरही खाल्ल्यास छान चव येते.

## वास्तू

* जेवण शिजवणाऱ्या उष्णतादेय वस्तूजवळ अंथरुण असू नयेत. त्यावर झोपल्याने मस्तकशूळ उठतो. मेंदूचे विकार उद्‌भवतात.

* त्याचप्रमाणे गुरुवारी नेहमी पांढऱ्या रंगाचेच कपडे घालावे काळ्या रंगाचे कपडे वापरू नयेत. पांढरा रंग हा स्वच्छतेचे प्रतिक असून तो आपले गुरुबल वाढवतो.

* जर एखाद्या घरात वास्तुदोषांमुळे वारंवार भांडणे होत असतील तर अशा घरात खास करून आजारी माणसाच्या खोलीत त्याच्या बिछान्याजवळ थोडेसे मीठ पाण्यात मिसळून काचेच्या बाऊलमध्ये ठेवावे लाभ होतो.

## सल्ला

* सकाळी उपाशीपोटी आवळ्याचा मुरब्बा खाल्ल्याने बुध्दी तेज होते.

* जर शाकाहारी असाल आणि बॉडीबिल्डींग करायची असेल तर मांसाहारापेक्षा काजू व बदाम असा सुकामेवा आहारात घ्यावा.

## सौंदर्य

देशी लाल गुलाबाच्या पाकळ्या वाटून त्यात थोडेसे ग्लिसरीन मिसळून दाट लेप बनवून रात्री झोपताना ओठावर लावा. यामुळे ओठावर लाली येते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शनिवार, दि. २६ जुलै २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष, आश्लेषा १५।५२, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३४ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : दिवस चांगला जाईल. महत्त्वाच्या कार्यात हितचिंतकांकडून मदत मिळेल. वाहन चिंता सतावेल. आरोग्य उत्तम राहिल. सामाजिक कार्यामध्ये यशस्वी व्हाल.

**वृषभ** : जुने मित्र भेटतील. हितशत्रुंपासून सावधान. वाहने सावकाश चालवावीत. कलाक्षेत्रातील व्यक्तींच्या कामात स्थिती सुखद राहील. नवीन करार होतील. आरोग्य उत्तम राहील.

**मिथुन** : व्यावसायिक अडचणी सतावतील. पितृचिंता जाणवेल. वैवाहिक सुख वाढेल. नोकरपेशा व्यक्तींसाठी काळ चांगला आहे. आरोग्याच्या दृष्टीने काळ अनुकूल आहे.

**कर्क** : कौटुंबिक विषयांमध्ये वेळ अनुकूल राहील. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. मानसन्मानात वाढ होईल. आपल्या स्वभावावर नियंत्रण ठेवावे.

**सिंह** : धार्मिक भावना वाढेल. सामाजिक कार्यांमध्ये अनुकूल सहयोग मिळेल व सन्मान वाढेल. वडीलधाऱ्यांचा आदर करावा. व्यापार व नोकरीच्या दृष्टीने चांगला दिवस.

**कन्या** : राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषदायक राहील. भातृचिंता सतावेल. वाहनपिडेचा संभव आहे. जुन्या-जाणत्यांचा अनुभव कामी येईल.

**तूळ** : पितृचिंता सतावेल. न्यायसंबंधी विषयांमध्ये यश मिळेल. महत्वपूर्ण कार्यांमध्ये यश मिळेल. आरोग्य उत्तम राहील.

**वृश्चिक** : दिवस आनंदात जाईल. मानसन्मानात वाढ होईल. आपल्या क्रोधावर संयम ठेवा आणि सहकार्यांबरोबर वादाची स्थिती टाळा.

**धनु** : पूर्वीपासून आपल्या मनातील असलेले संकल्प पूर्ण होतील. पुर्वी केलेल्या श्रमांचे फळ आज मिळेल. मात्र विवेक सदैव जागृत ठेवावा.

**मकर** : आपण आपल्या घरासाठी मोठी खरेदी करू शकता. कार्य योग्य वेळी पूर्ण करण्यासाठी कठोर श्रम करावे लागतील. आजचा दिवस जोमदार ठरेल. भावांचे सहकार्य लाभेल.

**कुंभ** : आपला विधायक दृष्टीकोन इतरांबरोबर समन्वय साधण्यात मदत करतो. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषदायक राहील. नवीन वास्तू व वाहन घेण्यासाठी उत्तम दिवस राहिल.

**मीन** : आपण आपल्या घरासाठी मोठी खरेदी करू शकता. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषदायक राहील. भातृचिंता सतावेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२२८

सौ.शैलजा कुलकर्णी



**उभे शब्द :-** १) उत्तरप्रदेशची राजधानी ३) शंकर, महादेव, नीळकंठ ६) फासळी ७) कमी करणे, काटकसर ९) झाडावर पिकलेले फळ १०) गणेश, गजानन, गजवदन १२) स्त्रियांचे एक सौभाग्य, लाखेची बांगडी १३) एक तृणधान्य १५) शीत, गार १७) शिवाजी महाराजांच्या राज्यातील एक किल्ला २०) प्रचंड, टोलेजंग २१) एकसारखे एकीकडेच पाहणे, एकाग्र दृष्टी २२) खारटपणा असलेले

**आडवे शब्द :-** १) मुरड, उसण, चमक २) मोठा नगारा, डंका ३) बी वगैरे उगवण्याचा प्रकार ४) मजला, माळा, एका झाडाचे पेय ५) नाव, होडी, छोटे जहाज ८) झाडावर चढताना पाय ठेवण्यासाठी झाडाला केलेली लहानशी खोबण, प्रारंभ, पद्धत, मार्ग ९) सोपान, शिडी १०) संरक्षणासाठी रात्री केला जाणारा फिरता पहारा ११) आवड नसणे १२) पश्चात्तापाचा चटका, हुरहुर १४) भिन्नता, गुप्त बातमी, गट्टी फोडणे, अलग होणे १६) कवीने केलेली रचना, कविता, कवन १८) दीन, गरीब १९) राखण, राख, भस्म, राखी २०) भक्ती करणारा, भाविक, निष्ठा ठेवणारा

### शब्दगंध क्र. ७२२७ चे उत्तर



### फिल्मीचक्कर क्र. ११९८ चे उत्तर



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : धैर्य म्हणजे संतोषाची कुपी आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### घामाला वास का येतो? घामाचे डाग कपड्यावर का पडतात?

घामात पाण्याखेरीज असणारा महत्त्वाचा घटक म्हणजे सोडियम क्लोराईड हा क्षार. याखेरीज इतर टाकाऊ पदार्थही असतात. कपडे घामाने भिजल्यानंतर कालांतराने घामातील पाण्याचे बाष्पीभवन होते व कपड्यावर क्षार तसेच इतर उत्सर्जित पदार्थ यामुळे डाग पडतात. सामान्यपणे घामाला कोणत्याही प्रकारचा वास नसतो. काखेतील घामाचा विशिष्ट प्रकारचा वास येतो. विशेषतः बस, लोकल अशा खूप गर्दीच्या ठिकाणी हे वास प्रकर्षाने जाणवतात. घामाला वास नसला तरी काख व शरीराच्या इतर भागातील घामाला तेथे जंतूसंसर्ग झाल्याने वास येतो. उन्हाळ्याच्या दिवसात थंड पाण्याने दिवसातून दोनदा तरी स्नान करावे, म्हणजे शरीराची स्वच्छता नीट राखता येईल. साधारणतः टाल्कम पावडरचा वापर केल्यास घाम येण्याचे प्रमाण कमी होईल. घामोळ्या झाल्या असतील तर औषधीयुक्त पावडरी वापराव्यात. असे उपाय केल्यास घाम जास्त येणार नाही व आला तरी योग्य ती स्वच्छता राखली गेल्याने त्याला वास येणार नाही.

### खरा शिष्य कोण?

एकदा दोन तरुण स्वामी विवेकानंदांकडे गेले. त्यांना स्वामीजीचे शिष्य व्हायचे होते. तसे त्यांनी सांगितले. तरी स्वामीजी डोळे मिटून स्वस्थ बसले. दुसरे दिवशी तोच प्रकार - कंटाळले- पण एकजण स्वामीजींची रोज पूजा करे तर दूसरा त्यांना दोष देई, तुमच्यात माणुसकी नाही, तुम्ही कठोर आहात वगैरे, पण दोघेही रोज येण्याचे थांबेनात. दोघांनाही वाटे आपणच त्यांचे शिष्य होण्यास योग्य आहे.

एकजण रोज पूजा करी. दूसरा दोष देई. एक दिवस नदीला पुर आला पहिल्याने नाईलाजाने आपल्या काठावरच पूजा-स्तोत्र वगैरे कार्यक्रम केला. दोष देणारा मात्र पुरातून जाऊन स्वामीजींची निंदा करुन आला. असे तीन दिवस चालले. चौथ्या दिवशी पुर ओसरला. दोघेही गेले. स्वामीजींनी डोळे उघडले व शिव्या देण्याऱ्याला शिष्य म्हणून स्वीकारले. ते म्हणाले, शिव्या देण्यासाठी का होईना तो संकटावर मात करुण येतो. निष्ठा हवी. तामसी वृत्ती बदलता येईल. पण कच खाणारी निष्ठा बदलता येणार नाही.

**तात्पर्य** : खरी निष्ठा महत्त्वाची.

## जीवन का अमृत (भाग १)



जब हम प्रभु के शब्द के साथ जुड़ते हैं, तो हम अन्दर से प्रसन्न हो जाते हैं, आनन्द से भरपूर हो जाते हैं। ऐसी अवस्था हमें पहली बार प्राप्त होती है। दुनिया के साधनों से हमें जितना भी आनन्द मिलता है, उससे हजारों गुना ज्यादा आनन्द, शांति और प्रेम हमें अंतर की दुनिया में मिलता है। जब हम उस अवस्था में होते हैं, तो फिर हम पर दुनिया की धूप और छांव का असर नहीं होता। बाहर सर्दी हो या गर्मी, हम गरीब हों या अमीर, हम बीमार हों या तन्दुरुस्त, हमारे बाल-बच्चों की हालत कैसी है, माँ-बाप की हालत कैसी है, पति-पत्नी की हालत कैसी है, इन सबका हम पर कोई असर नहीं होता क्योंकि हम प्रभु की सत्ता के साथ जुड़ जाते हैं। हम एक वातानुकूलित सी जिंदगी व्यतीत करनी शुरू कर देते हैं।

संत दर्शनसिंहजी महाराज फ़रमाया करते थे, 'We have to live in the world in a detached manner,' हम दुनिया में रहें जरूर, मगर प्रभु से जुड़े रहें और यह तभी हो सकता है, जब हम अंतर्मुख होकर शिवनेत्र पर एकाग्र होकर शब्द के साथ जुड़े रहें। गुरु अर्जनदेव जी महाराज फ़रमा रहे हैं, जब हम उस सत्ता के साथ जुड़ते हैं, तो हम पर बाहर की दुनिया का असर नहीं होता। हम एक आनन्द से भरपूर जिंदगी जीते हैं और हमारा पूरा ध्यान प्रभु की ओर होता है।

### बसंत ऋतु

हम हर तरफ हरियाली पाते हैं, कोई पतझड़ नहीं, कोई सर्दी गर्मी नहीं, हमें सब कुछ ठीक लगता है। जब कमरा वातानुकुलित होता है, तो चाहे बाहर गर्मी हो लेकिन कमरे में तापमान इतना होता है, जितना शरीर को ठीक लगे। यदि बाहर सर्दी है, तो भी कमरे का तापमान हमारे अनुकूल होता है। यही हालत हमारी होती है, जब हम प्रभु की ज्योति से जुड़ते हैं, शब्द के साथ जुड़ते हैं।

जिंदगी में उतार-चढ़ाव आते रहते हैं, लेकिन हम पर उनका कोई असर नहीं होता क्योंकि हमें यह यकीन हो जाता है कि बाहर की दुनिया माया की है। मानव चोला धारण करने का ध्येय यही है कि हमें अपने आपको जानना है और हम अपना सारा समय उसी ध्येय को पूरा करने में लगायें।

सभी महापुरुषों ने फ़रमाया है कि यदि हम एक घंटा भजन-सुमिरन में देते हैं, तो वह अंतर के मंडलों में हजारों घंटे तपस्या, भजन करने के बराबर है। इस सुनहरे अवसर का हमें पूरा-पूरा फायदा उठाना चाहिए। आगे फरमा रहे हैं :

**सगली रूती हरिआ होइ।**

हमें ऐसे लगने लगता है जैसे हर तरफ़ बहार ही बहार हो, बसंत हो और जब मैं अपने गुरुदेव में लीन हो गया, तो मेरे अंतर में आनन्द ही आनन्द छा गया। जब अंतर में सत्गुरु प्रकट हुए, तभी मैंने सच्ची कमाई की दुनिया की कमाई की जो धन-दौलत, जमीन-जायदाद है, वह सच्ची कमाई नहीं है। सच्ची कमाई केवल प्रभु के साथ जुड़ना है, नाम की कमाई करना है, शब्द के साथ जुड़ना है। जब हम अंतर में प्रभु से जुड़ते हैं, तो हम प्रभु जैसे ही हो जाते हैं। एक सूफी ने इस अवस्था के बारे में कहा है :

**मैं तू हो गया, तू मैं हो गया ।**
**मैं तन हो गया तू जान हो गया ।।**

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

मानव परिवार एक वृक्ष का रूप धारण कर लेता है, जो नाटक की पूरी अवधि में बढ़ता रहता है। वृक्ष का तना एक एकीभूत विश्व का प्रतिनिधित्व करता है, जिसमें शुद्ध आध्यात्मिक ज्ञान हमें एक-दूसरे के साथ और अनुकूल परिस्थितियों में अटूट समरसता एवं सुख में जीवन व्यतीत करने योग्य बनाता है। उस क्षेत्र में जनसंख्या सापेक्षतः कम होती है।

समय का चक्र जैसे-जैसे आगे बढ़ता है और वृक्ष अधिक बड़ा होने लगता है, तो मूलभूत एकता विलुप्त हो जाती है। फिर भी धार्मिक विश्वास एवं प्रथा की पनपी हुई विशाल शाखाएँ लाखों-करोड़ों को इस ढंग से जीने के लिए प्रेरित करती रहती हैं, जिससे कि उन्हें ईश्वर तथा एक-दूसरे के अधिक निकट लाया जा सके।

**वर्तमान का महत्त्व।**

ब्रह्माबाबा को उनकी अंतर्दृष्टि से और अपने चारों ओर संसार में फैले अज्ञान के अंधकार को देखकर तुरंत इस बात का एहसास हुआ कि उन्हें विश्व को नया रूप देने का कार्य अब अविलंब आरंभ करना होगा। उन्होंने महसूस किया कि मानव परिवार पुराने और नए के बीच एक संगम काल में प्रवेश कर रहा है तथा परमात्मा उन्हें चेतना का नवीकरण

### आज्ञा चक्र

करने संबंधी कार्य का नेतृत्व करने हेतु पुकार रहा है, ताकि नई सृष्टि को अस्तित्व में लाया जा सके।

हालाँकि उनका कहना था कि यह संगम सौ वर्ष तक चलेगा, नवीकरण के कार्य में उनका साथ देने के लिए उनसे जुड़े लोग आरंभ से ही इस धारणा को दिल में बसाए हुए थे कि एक शुद्ध नवीन संसार को अस्तित्व में लाने के लिए उन्हें अपने अंदर आवश्यक परिवर्तनों की दिशा में अभी से पहल करनी होगी।

ब्रह्माबाबा को भान हीं गया था कि विश्वव्यापी परिवर्तन का समय एकदम निकट आ चुका है और इसी तात्कालिकता से प्रेरित होकर उन्होंने अपने जीवन में इस तरह का नाटकीय परिवर्तन लाने की दिशा में कदम उठाने का निर्णय किया, उन्होंने अपना सारा कारोबार समेट लिया और उसके निपटान से प्राप्त रकम युवा स्त्रियों के एक समूह को सौंप दी, ताकि आध्यात्मिक विश्वविद्यालय के संस्थापक सदस्य मिलकर रह सकें और काम कर सकें। । अपने सन्निकट परिवार के संबंध में जिम्मेदारियों को पूरा करते समय उन्होंने बहुत शीघ्र देह-चेतना प्रेरित मानसिकताओं और आचरणों का त्याग कर दिया, जो मन तथा बुद्धि को खींचते हैं तथा ईश्वर के साथ हमारे संबंध में बाधा उत्पन्न करते हैं। उन्होंने यह त्याग इतने प्रभावपूर्ण ढंग से किया कि वे ईश्वर के काम के लिए एक माध्यम बन गए। उनके अंदर कोई दिव्य शक्ति प्रवेश कर गई थी, जो उनके कार्यों को सही मार्ग दिखा रही थी तथा दूसरों को प्रेरित कर रही थी। वे प्रेम एवं ज्ञान की इस शक्ति का श्रेय सदैव ईश्वर को देते थे।

जिन लोगों ने इस देवत्व को पहचाना, उन्होंने भी इस प्रकार की तात्कालिकता को महसूस किया, जो उनके प्रयास के लिए एक प्रेरक शक्ति बन गई। दादी जानकी कहती हैं हम जान गए कि हम सोच-विचार करने और जुड़ने के पुराने तरीकों से जितना अधिक दूर हटेंगे, हमारी आत्मा में अंतर्निहित प्रेम, शांति एवं सुख रूपी तत्त्व हमारे जीवन को उतना ही अधिक विशिष्ट रूप प्रदान करने, ऊपर उठाने में समर्थ होंगे। हम ३०० सदस्य एक सुदृढ समुदाय के रूप में १४ वर्ष तक कराची में रहे और उस अवधि में एक साथ रहते हुए हमें ऐसा अनुभव हुआ, मानो हम अपने पुराने शरीर को पहले ही त्याग चुके हैं, स्वयं में सीमित हो गए हैं।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

वडील : मोठी झाल्यावर काय करशील?
मुलगी : लग्न...
वडील : चुकीची बाब...आतापासून कोणाबद्दल असले वाईट विचार ठेवू नये...

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* टि-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारणारा भारतीय खेळाडू कोण?
- रोहित शर्मा

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# काय खावे?

४. बाळंतिणीच्या दिनचर्येमध्ये जेवणानंतर आवर्जून भाजलेली बडीशेप, ओवा, तीळ, धणाडाळ यांचे मिश्रण करून खाण्यास द्यावे. याने जास्त प्रमाणात घेतलेल्या आहाराचे पचन होऊन आम निर्मिती होत नाही. त्यामुळे बाळाला शुद्ध दुधाचा पुरवठा होतो.

५. बडीशेपेच्या सेवनाने शरीरातील रक्त शुद्ध होऊन त्वचाविकार दूर होतात. रक्त शुद्ध झाल्यामुळे त्वचेचा रंगही उजळतो.

६. बद्धकोष्ठतेचा त्रास वारंवार जाणवत असेल, तर अशा वेळी रात्री झोपताना बडीशेपेचे चूर्ण कोमट पाण्याबरोबर घेतल्यास शौचास साफ होऊन पोटातील गॅस कमी होतो.

७. हरभरा, मटकी या कडधान्यांपासून बनविलेल्या अन्नपदार्थामुळे पोटात गॅसेस निर्माण होतात. म्हणून या पदार्थापासून अन्न तयार करताना बडीशेपेचा वापर केल्यास पोटात गॅसेस निर्माण होत नाहीत.

८. उन्हाळ्यामध्ये उष्णतेचा त्रास होऊ नये म्हणून व शरीराची पचनशक्ती वाढविण्यासाठी

### बडीशेप

बडीशेप, नागवेलीची पाने, गुलकंद हे मिक्सरमध्ये बारीक करून दुधातून घेतल्यास उष्णतेपासून होणारा त्रास थांबतो. या थंडाईमुळे मनाला व शरीराला आल्हाददायक वाटते.

९. बडीशेप बुद्धिवर्धक आहे. त्यामुळे लहान मुलांची, तरुण मुलांची व नोकरदारवर्गाची बुद्धिमत्ता वाढविण्यासाठी जेवणानंतर नियमितपणे भाजलेली बडीशेप खावी. निरनिराळ्या कारणांनी शारीरिक दुर्बलता येऊन मानसिक थकवाही अनेकांना जाणवतो, अशा वेळी बडीशेप खाल्ल्यास शरीरात उत्साह संचारतो.

१०. अजीर्ण होऊन करपट ढेकरा येत असतील, तर अशा वेळी बडीशेप पाण्यात उकळून त्यात थोडी खडीसाखर घालावी व हा तयार झालेला काढा कोमट असतानाच त्याचे सेवन केल्यास अजीर्णासारखे विकार दूर होतात.

११. बडीशेप, तीळ-धणाडाळ, जवस भाजून त्यात थोडे मीठ व लिंबाचा रस घालून ते एका बाटलीत भरून ठेवावे व जेवणानंतर हे मिश्रण खाल्ल्याने तोंडाची दुर्गंधी जाऊन मुखशुद्धी होऊन खाल्लेल्या अन्नाचे पचनही सुरळीत होते.

१२. लहान बालकांना बडीशेपचा अर्क दिल्यास त्यांना वारंवार अपचन, उलटी व गॅसचा त्रास होत नाही.

सावधानता :

काही लोक वारंवार बडीशेप खातात व एकप्रकारे व्यसनासारखे तिच्या अधीन होतात. परंतु असे न करता जेवणानंतर अगदी थोड्या प्रमाणात मुखशुद्धीसाठी व घेतलेल्या अन्नाचे पचन होण्यासाठीच तिचा वापर करावा. अति प्रमाणात बडीशेप खाल्ल्यास तोंडाच्या आतून चिरा पडतात. तसेच पोटात देखील दाह, उष्णतेचा त्रास जाणवू शकतो.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# आनंदऋषी हॉस्पिटलमधील बालरोग विभागात एकाच छताखाली उपचार उपलब्ध

### डॉ.गणेश गव्हाणे यांचे प्रतिपादन; मोफत बालरोग तपासणी शिबिरात १२५ रुग्णांची तपासणी



आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या जन्मदिनानिमित्त मोफत बालरोग तपासणी शिबिराचे उद्‌घाटन दीपप्रज्वलनाने करताना बालरोग तज्ज्ञ डॉ.गणेश गव्हाणे, डॉ. विजय साठे, डॉ.दिपी अग्रवाल, डॉ.वैभवी वंजारे, डॉ.रुपेश सिकची.

नगर – आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये गेल्या वीस वर्षांपासून बालरोग विभाग कार्यरत आहे. नवजात अर्भकांसाठी २६ बेडचा अतिदक्षता विभाग कार्यरत आहे. बाल दमा व नवजात कावीळ साठी फोटोथेरपी व रक्त बदलण्याची सुविधा, आनुवंशिक आजार व जन्मजात आजारांवर निदान, लहान मुलांची हृदयरोग संदर्भात टु डी इको तपासणी, सर्व आजारांवरील लसीकरण ना नफा तोटा या तत्त्वावर उपलब्ध आहेत. तसेच कॅशलेस सुविधा व महात्मा फुले जन आरोग्य सुविधाच्या माध्यमातून आरोग्य सुविधा उपलब्ध आहे. नवजात बालकांसाठी अत्याधुनिक पद्धतीने उपचार पद्धती केले जाते. तसेच ज्या बालकांची शस्त्रक्रिया करावयाची आहे. त्यांच्यासाठी बालरोग सर्जन २४ तास सेवा देण्यासाठी उपलब्ध आहेत. या सेवेचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा. आनंदऋषी हॉस्पिटल मधील बालरोग विभागात एकाच छताखाली उपचार सुविधा उपलब्ध आहेत, असे प्रतिपादन बालरोगतज्ञ डॉ.गणेश गव्हाणे यांनी केले आहे.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या जन्मदिनानिमित्त मोफत बालरोग तपासणी शिबिराचे उद्घाटन बालरोग तज्ज्ञ डॉ.गणेश गव्हाणे, डॉ.विजय साठे, डॉ.दिपी अग्रवाल, डॉ.वैभवी वंजारे, डॉ.रुपेश सिकची यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी जैनसोशल फेडरेशनचे डॉ.प्रकाश कांकरिया, डॉ.वसंत कटारिया, माणकचंद कटारीया, सुभाष मुनोत आदी उपस्थित होते.

डॉ.वैभवी वंजारे म्हणाले, मुलांना पोषक अन्नपदार्थ द्यावेत. पावसाळ्याच्या काळात मुलांची विशेष काळजी घ्यावी. जी मुले अभ्यासात लक्ष देत नाहीत, वजन वाढत नाही, वजन जास्त आहे. अशा तक्रारी आढळल्यास याविषयी मार्गदर्शन केले जाते. आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे सकाळी दहा ते चार या वेळेत मार्गदर्शन करण्यासाठी डॉक्टर्स उपलब्ध आहेत.

दिपी अग्रवाल म्हणाले, मुलांना आजार होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपचार करणे आवश्यक आहे. मुलांची नित्यनेमाने तपासणी करावी. मुले उशिरा बोलतात, चिडचिड करतात तसेच काही मुलांच्या छातीमध्ये छिद्र असतात. या सर्व गोष्टींची तपासणी वेळोवेळी करणे आवश्यक आहे.

डॉ.विजय साठे म्हणाले, शिबिराच्या माध्यमातून बालकांची मोफत तपासणी करण्यात येते. या हॉस्पिटलमध्ये अनुभवी नर्सेस व स्टाफ असल्याने अचूक निदान व उपचार केले जातात.या हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांच्या माध्यमातून सेवाभावी वृत्तीने सेवा दिली जाते. शिबिरात १२५ रुग्णांची मोफत बालरोग तपासणी करण्यात आल्या. या शिबिरासाठी जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या विविध भागातून रुग्ण आले होते.

सूत्रसंचालन डॉ.वैभवी वंजारे यांनी केले. डॉ.वसंत कटारिया यांनी आभार मानले.



साई माऊली सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये न्यूरो सर्जन डॉ. अब्बास मोऐयादी यांचे स्वागत करण्यात आले.

# साई माऊली सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये न्यूरो सर्जन डॉ. अब्बास मोऐयादी उपलब्ध

नगर – एम्स हॉस्पिटलमधील न्यूरो सर्जन डॉ. अब्बास मोऐयादी हे पाईपलाईन रोडवरील साई माऊली सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये रुग्णांच्या सेवेसाठी पूर्णवेळ २४ तास उपलब्ध रहाणार आहे.

या निमित्त आयोजित सत्कार सोहळ्याचा प्रारंभ दीपप्रज्वलनाने करण्यात आला. यावेळी डॉक्टरांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी न्यूरो सर्जन डॉ.अब्बास मोऐयादी, डॉ. तुकाराम, डॉ. गणेश गीते, डॉ. वर्षा कराड, डॉ.जयश्री तोंडे, डॉ. मंगेश राऊत, डॉ. मनोज घुगे, डॉ. किरण तुपे, लक्ष्मण महाराज कराड, हॉस्पिटल प्रशासक अधिकारी युनूस टेंगे, जय हिंद फाउंडेशन संघटना अध्यक्ष शिवाजी पालवे, त्रिदल सैनिक संघटना अध्यक्ष कॅप्टन बाळासाहेब आंधळे आदीसह जिल्ह्यातील पेशंट नातेवाईक व हॉस्पिटल स्टाफ उपस्थित होता.

हॉस्पिटलमध्ये रुग्णांसाठी अद्ययावत सुविधा उपलब्ध असून यामध्ये आयसीयू, जनरल वॉर्ड, स्पेशल वॉर्ड, स्पेशल रूम व अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर यांचा समावेश आहे. सर्व प्रकारचे कॅशलेस सुविधा उपलब्ध असून, शासकीय योजना देखील उपलब्ध आहेत, अशी माहिती संचालक डॉ. संतोष गीते यांनी दिली.



विश्वभारती ॲकेडमीचे, अभियांत्रिकी महाविद्यालयात महिला सबलीकरण व सक्षमीकरण कार्यशाळा पार पडली.

# महिला सबलीकरण व सक्षमीकरण कार्यशाळेतून बळ मिळते

### पोलिस उपनिरीक्षक शितल मुगडे यांचे प्रतिपादन; विश्वभारती महाविद्यालयात कार्यशाळा उत्साहात

नगर – विद्यार्थीनींनी आपले भविष्य उज्वल करावे, महिला सक्षमीकरणासाठी आपण सक्षम आहोत याची खात्री स्त्रियांनी बाळगून पुढे जाणे आवश्यक आहे. जीवनात प्रगती करण्यासाठी शिक्षण हे प्रभावी माध्यम असून विद्यार्थ्यांनी उच्च दर्जाचे शिक्षण घेवून विविध क्षेत्रात नावलौकीक मिळवणे आवश्यक आहे. महिला सबलीकरणाचे या कार्यक्रमामुळे महिलांना एक मोठे व्यासपीठ निर्माण झाले असून त्यातून एक प्रेरणा घेवून पिढयानपिढ्यांची बंधने झुगारून सर्व क्षेत्रातील असमानता झुगारून समानता प्राप्त करण्याचे मोठे बळ या महिला सबलीकरण व सक्षमीकरण कार्यशाळेतून मिळत असल्याचे प्रतिपादन पोलिस उपनिरीक्षक शितल मुगडे यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार कार्यक्रमा अंतर्गत महिला सवलीकरण व सक्षमीकरण या कार्यशाळेचे आयोजन २३ जुलै रोजी करण्यात अले होते. कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव कमलेश बसवणअप्पा पाटणकर उपस्थित होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शिल्पा नरसाळे, पोलीस उपनिरीक्षक शितल मुगडे, डॉ. हेमा शेलोत उपस्थित होत्या.

तसेच डॉ. हेमा शेलोत यांनी महिलांनी त्यांचे स्वास्थ्य, आरोग्य, योगाभ्यास याबाबत लक्ष देणे आवश्यक असल्याचे नमूद केले. डॉ. शिल्पा नरसाळे यांनी विद्यार्थीनींना महिलांचे आरोग्य व मानसिक तणाव यावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या १५० पेक्षा अधिक विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रा. राधीका कपाटे यांनी केले. सूत्रसंचालन कु. समृधी परदेशी आणि कु. संपदा भोर यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. वैशाली धोंगडे, महाविद्यालयाचे सर्व महिला प्राध्यापक उपस्थित होते.

# बदलती जीवनशैली, वाढता तणाव, चुकीच्या आहाराने महिलांच्या आरोग्यावर विपरित परिणाम : डॉ. रितुजा

### प्रगती फाउंडेशनच्या वतीने महिलांची मोफत आरोग्य तपासणी, निरोगी आरोग्यासाठी आहार, व्यायामबद्दल मार्गदर्शन



जिल्हा क्रीडा कार्यालय अंतर्गत युवक कल्याण योजनेच्या माध्यमातून प्रगती फाउंडेशनच्या वतीने महिलांची मोफत आरोग्य तपासणी करताना डॉ. रितुजा डुबेपाटील.

नगर – स्त्री ही सृजनाची मूळ शक्ती असून तिच्या आरोग्यावर संपूर्ण कुटुंबाच्या स्वास्थ्याचे भवितव्य अवलंबून असते. बदलती जीवनशैली, वाढता तणाव, आहारातील बिघाड यामुळे महिलांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहेत. महिला वर्ग कुटुंबाच्या व्यस्त कामात आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे महिलांनी स्वतः च्या आरोग्याकडे गांभीर्याने लक्ष देण्याचे डॉ. रितुजा डुबेपाटील यांनी सांगितले. तर आहार, व्यायामबद्दल मार्गदर्शन केले.

जिल्हा क्रीडा कार्यालय अंतर्गत युवक कल्याण योजनेच्या माध्यमातून प्रगती फाउंडेशनच्या वतीने महिलांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तर महिलांना निरोगी आरोग्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. बालिकाश्रम रोड येथे झालेल्या या शिबिराचा महिलांनी उत्स्फूर्तपणे लाभ घेतला.

डॉ. रितुजा श्रीकांत डुबेपाटील यांनी महिलांची आरोग्य तपासणी केली. यावेळी प्रगती फाउंडेशनच्या अध्यक्षा अश्विनी वाघ, स्वाती संतोष हराळे, बालमनी पोता, अंबिका पोता, अंजू शेंडगे, अनुष्का पोता, उज्वला ढोमणे, सुशीला मिसाळ, साक्षी साळवे, अनिता मिसाळ, चंद्रकला गायकवाड, रूपाली धेंड, ज्योती अरगडे, अलका शेटे आदींसह महिला उपस्थित होत्या.

अश्विनी वाघ यांनी प्रगती फाउंडेशनच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासह विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी कार्य सुरु आहे. महिलांचे आरोग्य चांगले राहिल्यास कुटुंबातील प्रत्येकाचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. तर महिलांच्या निरोगी जीवनासाठी हा उपक्रम राबविण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अनिता मिसाळ यांनी आभार मानले.

या शिबिरासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, राज्य क्रीडा मार्गदर्शक विशाल गर्जे, प्रवीण कोंढावळे, क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, जय असोसिएशन ऑफ एनजीओचे ॲड. महेश शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

# संतुलित आहाराची संस्कृती रुजवणे हे आजच्या काळात अत्यावश्यक

### डॉक्टर वसंत खळदकर यांची माहिती, निरोगी आहार, आनंदी बालपणासाठी भारतीय बालरोग तज्ञ संघटनेचा पुढाकार





नगर – भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटनेच्या वतीने मुलांमध्ये योग्य पोषण व आरोग्यदायी जीवनशैलीसाठी पुढाकार घेण्यात आलेला आहे. आई–वडील, शिक्षक आणि पालक या सर्वांचं एकच उद्दिष्ट असून, मुलं निरोगी आणि आनंदी वाढली पाहिजेत. यासाठी सर्वात महत्त्वाचा पाया म्हणजे लहान वयातच आरोग्यदायी आहाराच्या सवयी निर्माण करणे असून, यासाठी भारतीय बालरोग तज्ञ संघटनेच्या माध्यमातून देशव्यापी जनजागृती मोहिम सुरु असल्याची माहिती संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. वसंत खळदकर यांनी दिली.

योग्य पोषण हा शारीरिक, मानसिक आणि भावनिक विकासासाठी अत्यंत आवश्यक घटक आहे. तो आयुष्यभर चांगल्या आरोग्याची आणि समतोल वाढीची पायाभरणी करतो. बालकांच्या आरोग्याचा पाया त्यांच्या ताटात असतो. मुलांमध्ये पोषणाबाबतची जागरूकता वाढवली, तर आपण त्यांना केवळ आज आरोग्यदायी ठेवत नाही, तर त्यांचे संपूर्ण आयुष्य घडवत असल्याचे डॉ. वसंत खळदकर यांनी म्हटले आहे.

मुलांच्या आरोग्यदायी जीवनशैलीसाठी संतुलित आहाराचे महत्त्व अनन्य साधारण आहे. फळे व भाजीपाल्याद्वारे जीवनसत्त्वे, खनिजे व फायबरचा भरपूर स्रोत, प्रथिनं म्हणून अंडी, दुग्धजन्य पदार्थ, डाळी व कडधान्ये स्नायू आणि ऊतींच्या वाढीसाठी, संपूर्ण धान्ये ज्वारी, बाजरी, तांदूळ, ओट्स ऊर्जा आणि फायबर तसेच दुग्धजन्य पदार्थः दूध, दही, चीज मजबूत हाडांसाठी कॅल्शियम आणि आरोग्यदायी फॅट्सः बदाम, अक्रोड, शेंगदाणे, ऑलिव्ह ऑईल मेंदूच्या विकासासाठी आवश्यक ठरते.

मुलांमध्ये आरोग्यदायी खाण्याच्या सवयी निर्माण करण्यासाठी आहारात विविधता आणणे आवश्यक आहे. मुलांना रंगीबेरंगी भाज्या, फळे व वेगवेगळ्या चवांची ओळख करून देणे, कुटुंबासोबत एकत्र जेवल्याने भोजनाशी सकारात्मक नाते तयार होते. स्वतःचे उदाहरण मुलांपुढे ठेवा, मोठ्यांचे खाण्याचे सवयी लहान मुले नकळत स्वीकारतात. प्रोसेस्ड अन्न आणि साखरयुक्त पेये टाळावे लठ्ठपणा, दातांचे विकार आणि ऊर्जा घसरण टाळण्यासाठी आहार खेळकर बनवणे व आहार सादर करताना कल्पकता वापरल्यास ते निश्चित मुलांना आवडत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

भावनिक आणि सामाजिक आरोग्याचाही संबंध असून, फक्त शरीरासाठीच नव्हे, तर निरोगी आहार मानसिक संतुलन, चांगले मूड, आणि ऊर्जा टिकवून ठेवण्यास मदत करतो. कुटुंबासोबत घेतलेले जेवण भावनिक बंध वाढवतात आणि अन्नाबद्दल सकारात्मक दृष्टीकोन तयार करतात. निरोगी आहार ही आरोग्याची सुरुवात नाही, तर ती संपूर्ण आरोग्यदायी जीवनशैलीची गुरुकिल्ली आहे. आपल्या घरात, शाळांमध्ये आणि समाजात संतुलित आहाराची संस्कृती रुजवणे हे आजच्या काळात अत्यावश्यक असल्याचे डॉ. खळदकर यांनी स्पष्ट केले.

# महाराष्ट्र आणि गोवा नोटरी असोसिएशनच्या कार्याध्यक्षपदी ॲड.भाग्यश्री बोरा यांची निवड



श्रीरामपूर – महाराष्ट्र आणि गोवा नोटरी असोसिएशन या संस्थेच्या कार्याध्यक्षपदी ॲड. भाग्यश्री सुनील बोरा (रा. शिरुर, जि. पुणे) यांची नियुक्ती झाली आहे. ॲड. भाग्यश्री बोरा यांना २००४ मध्ये वकिली सनद मिळाली. २००९ पासून त्यांनी स्वतंत्र न्यायालयीन प्रॅक्टीस सुरू केली. त्या दिवाणी, फौजदारी व महसूल न्यायालयामध्ये पक्षकारास न्याय मिळवून देण्यासाठी काम पाहत आहेत. २००९ पासून त्यांची नोटरी ॲडव्होकेट भारत सरकार म्हणून नियुक्ती झाली. २०२३–२४ मध्ये शिरुर (घोडनदी) तालुका वकील संघटनेच्या उपाध्यक्षपदी त्यांची बिनविरोध निवड झाली.

ॲड. भाग्यश्री बोरा या शिरुर तालुक्यातील सोसायटीचे प्रश्न मिळकतीचे व्यवहार, नोंदणीचे काम पाहतात. ८ बँकेच्या कायदेशीर सल्लागार असून शिरुर, पुणे, नगर, श्रीगोंदा, पारनेर न्यायालयामध्ये वकिली व्यवसाय करीत आहेत. दस्त नोंदणीचा १८ वर्षापासून आणि नोटरी अधिकारी म्हणून २०१९ पासून कार्यरत आहेत. त्यांचा कामाचा अनुभव विचारात घेवून महाराष्ट्र आणि गोवा नोटरी असोसिएशनच्या पदाधिकार्यांनी त्यांची असोसिएशनच्या कार्याध्यक्ष पदावर नियुक्ती केली आहे.

वकिली व्यवसायाच्या प्रगतीमध्ये ॲड. सतिष धोका, ॲड. सुमतीलाल बलदोटा, ॲड. सय्यद अली, ॲड. यशवंत खराडे, ॲड. नितेश ललवाणी, ॲड. प्रविण नागवडे, ॲड. महावीर कांकरिया, ॲड. शोभा कड व असोसिएशनमधील पदाधिकारी ॲड. लोळगे, ॲड. संजय वाखारे, ॲड.पटकी, ॲड. वर्मा, विरेंद्र सावंत यांच्यासह शिरुर न्यायालयातील ज्येष्ठ विधीज्ञांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

ॲड. भाग्यश्री बोरा या श्रीरामपूर येथील कोठारी ॲडव्हटायझिंगचे संचालक ललीत कोठारी यांच्या त्या मेहुणी आहेत.



जनजाती कल्याण आश्रम नगर शाखेच्या जिल्हाध्यक्षपदी अरविंद पारगावकर यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना प्रांत सचिव शरद शेळके.

# जनजाती कल्याण आश्रमच्या जिल्हाध्यक्षपदी अरविंद पारगावकर

नगर – संघ परिवारातील जनजाती कल्याण आश्रम अहिल्यानगर शाखेच्या जिल्हाध्यक्षपदी स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया कंपनीचे उपाध्यक्ष अरविंद पारगावकर यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे.

यानिमित्ताने नव्या कार्यकारणी पदाधिकाऱ्यांचा सत्कार व स्नेहमेळाव्याचे आयोजन आयुर्वेद व्यासपीठाच्या सभागृहात झाले. यावेळी जनजाती कल्याण आश्रमाचे प्रांत सचिव शरद शेळके यांच्या हस्ते स्नेहमेळाव्याचं उद्घाटन होऊन नूतन अध्यक्ष अरविंद पारगावकर व नूतन सचिव अनंत फंड यांच्यासह पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रा.स्व.संघाचे जिल्हा संघचालक वाल्मिक कुलकर्णी, प्रा.डॉ.अनिल सहस्रबुद्धे, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, राजाभाऊ मुळे, मावळते अध्यक्ष महेंद्र जाखेटे व मावळते सचिव डॉ.निळकंठ ठाकरे आदी उपस्थित होते.

विशारद पेटकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून सूत्रसंचालन केले. रोहिणी शिवलकर यांनी मनोगत व्यक्त केले. श्रीकांत आपटे यांनी नगर जिल्हा कार्यालयासाठी एक फ्लॅट देत असल्याचे जाहीर केले. मिलिंद मुळे यांनी आभार मानले. यावेळी कार्यकर्ते, देणगीदार, हितचिंतक उपस्थित होते.

जनजाती कल्याण आश्रमाची अहिल्यानगर शाखेची कार्यकारणी – अध्यक्ष अरविंद पारगावकर, सचिव अनंत फंड, कोषाध्यक्ष अनिल लवांडे, सहसचिव उमेश खिंडारे, सह कोषाध्यक्ष मिलिंद मुळे, महिला कार्यप्रमुख डॉ. मैत्रेयी लिमये, कार्यकारणी सदस्य शेखर भावे, राजेंद्र डांगे, अरविंद वाबळे, संजय कुलकर्णी, सोमनाथ पवार व हरजीत माळी.

# ए.एच. पोखरणा ज्वेलर्सची श्रावणानिमित्त धमाकेदार योजना



नगर – नगरमधील ए.एच. पोखरणा ज्वेलर्सच्या सर्जेपुरा व सथ्था कॉलनी या दोन्ही दालनात खास श्रावण मासानिमित्त मौल्यवान खरेदीचा आनंद द्विगुणित करणारी योजना सुरू झाली आहे. यात सोन्याच्या दागिन्यांची खरेदी केल्यास २१०० रूपये प्रती तोळा (प्रति १० ग्रॅम) अशी सूट दिली जात आहे. याशिवाय भाग्यवान ग्राहकांना ई बाईक जिंकण्याची संधी मिळणार आहे. तसेच प्रत्येक खरेदीवर ग्राहकांना आकर्षक बक्षीस दिले जाणार आहे, अशी माहिती अमित पोखरणा व आकाश पोखरणा यांनी दिली.

अनिल पोखरणा यांनी सांगितले की, दोन्ही दालनात या योजनेचा लाभ ग्राहकांना मिळणार आहे. यात डायमंड दागिने खरेदी केल्यास मजुरीवर १०० टक्के सवलत मिळणार आहे. हॉलमार्क प्रमाणित सोन्याच्या दागिन्यांवर १०० टक्के एक्सचेंज मिळणार आहे. दालनात सोन्याचांदीच्या कलाकुसरीच्या नाजूक राख्यांसह खास रोझ गोल्डच्या राख्याही भरपूर व्हरायटीत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

दालनात गंठणमध्ये अँटीक गंठण, पट्टी, राजकोट, डायमंड, मोती, काळे मणी, जेबी स्टोन, इटालियन मंगळसूत्र तसेच टेम्पल गंठणही उपलब्ध आहे. टेम्पलमध्ये नेकलेस, कानातले, अंगठी विविध आकर्षक व सुंदर डिझाईन उपलब्ध आहेत. दालनातील सर्व दागिने हॉलमार्क प्रणितच असून सोने (दागिने) मोडताना कुठल्याही प्रकारची घट कापली जात नाही. नगर शहरात सर्वात कमी मजुरी दरही याच दालनात आहे. महिलांना चोखंदळपणे त्यांच्या मनातील डिझाईनचे सुवर्ण अलंकार याठिकाणी निश्चितच मिळतात. ५ ग्रॅमपासून ते १५० ग्रॅमपर्यंत वजनाच्या दागिन्यांची रेंज येथे आहे. दागिने तसेच हिऱ्यांची अत्युच्च गुणवत्ता याठिकाणी ग्राहकांना मिळते. डायमंडचे स्वतंत्र काउंटर दालनात आहे. चांदीचे पैंजण तसेच अन्य दागिने, भेट वस्तू, देवीदेवतांच्या मूर्ती, पूजा साहित्य, चांदीची नाणी दालनात आहेत. श्रावणातील मौल्यवान खरेदी संस्मरणीय करण्यासाठी ग्राहकांनी दालनाला भेट द्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.



### स्कॉटलंडमध्ये डॉ. दीपक हरके एक्सलेंस अवॉर्डने सन्मानित

स्प्रिंगकेल कॅसल, स्कॉटलंड येथे येथे जगभरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना लंडन ऑर्गनायझेशन ऑफ स्किल्स डेव्हलपमेंट च्या वतीने एक्सलेंस अवॉर्ड देऊन गौरविण्यात आले. यामध्ये जगभरात १४३ देशात ८५०० हून अधिक सेवाकेंद्राच्या माध्यमातून निशुल्क ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यानधारणा प्रशिक्षक ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांचा जगभरात भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रचार व प्रसार केल्याबद्दल लंडन मधील साऊथवर्क चे महापौर सनी लँबे यांच्या हस्ते एक्सलेंस अवॉर्ड २०२५ ने सन्मानित करण्यात आले. यावेळी सीईओ डॉ. परिन सोमाणी, साईदीप हेल्थकेअर ॲण्ड रिसर्च प्रायव्हेट लिमिटेडचे संस्थापक अध्यक्ष डॉ. दीपक एस.एस. व समाजसेवक डॉ. शाम लोकरे उपस्थित होते.



### महात्मा फुले वसतिगृह, लांडे थळ व सर्जेपुरा वस्तीमध्ये गरजू विद्यार्थ्यांना शालेय वह्याचे वाटप

महात्मा फुले वसतिगृह, लांडे थळ व सर्जेपुरा वस्तीमध्ये गरजू विद्यार्थ्यांना मातोश्री प्रतिष्ठानचे संस्थापक बाबु टायरवाले यांच्या वतीने शालेय वह्याचे वाटप करण्यात आले. यावेळी बाळासाहेब बोराटे, अशोक दहिफळे, महेश लोंढे, पोपट पाथरे, आनंद शेळके, अडवोकेट पुष्पा येळवंडे, सुरेश क्षीरसागर, पांडुरंग घोरपडे आदीसह विद्यार्थी, पालक, शिक्षक उपस्थित होते. (छाया – लहू दळवी)

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## पर्वतीय प्रदेशातील नागरिकांवर नवं संशोधन



मैदानी क्षेत्रांच्या तुलनेत पर्वतांवर ऑक्सिजन अर्थात प्राणवायूचे प्रमाण कमी असते. ज्यामुळे जेव्हा जेव्हा मैदानी क्षेत्रातील कोणीही पर्वतरांगांमध्ये जाते तेव्हा त्यांना श्वासोच्छ्वासास त्रास होतो. या प्रक्रियेला 'हायपॉक्सिया' असे म्हटले जाते; मात्र पर्वतीय भागातच पिढ्यान्पिढ्या राहणाऱ्या लोकांना असा त्रास होत नाही. याचे कारण म्हणजे त्यांच्या शरीराने अशा स्थितीत राहण्यासाठी स्वतःला अनुकूल बनवलेले आहे. मागील १० हजार वर्षांपासून पर्वतरांगांमध्ये वास्तव्यास असणाऱ्यांच्या शरीरात तेथील भौगोलिक स्थितीमध्ये हवामानानुसार बदल झाले आहेत.

अमेरिकेच्या केस वेस्टर्न विद्यापीठाच्या अँथ्रोपोलॉजिस्ट सिंथिया बील यांच्या निरीक्षणानुसार मागील १० हजार वर्षांमध्ये पर्वतीय क्षेत्रांतील नागरिकांच्या शरीरात तेथील वातावरणाच्या अनुषंगाने बदल झाले आहेत, त्यांचे शहर आवश्यकतेनुसार विकसित झाले आहे. ही मंडळी ज्या उंचीवर वास्तव्यास असतात तिथे मैदानी क्षेत्रातील नागरिकांना डोकेदुखी, श्वसनास त्रास, कानांवर हवेचा दाब वाढल्याचे जाणवणे अशा अडचणी जाणवू लागतात, पण स्थानिकांमध्ये मात्र यातील एकही लक्षण दिसत नाही, कारण त्यांच्या शरीराने येथील वातावरण आत्मसात केलेले असते. सिंथिया यांच्या मते एकंदर निरीक्षणातून लक्षात येत असलेल्या मुद्द्यानुसार मनुष्य हा एकमेव असा सजीव आहे, जो विविध भौगोलिक स्थितींनुसार स्वतःच्या शरीरात नकळत बदल घडवून आणत असतो. तिबेटच्या नागरिकांच्या शरीरात असेच काही जनुकीय बदल झाले आहेत. जिथे कमी ऑक्सिजनपुरवठ्यातही त्यांच्या शरीरात काम करण्याची क्षमता विकसित झाली आहे. त्यांची श्वासोच्छ्वास यंत्रणा उत्तम काम करत असून, हृदयही त्यानुसारच कार्यक्षम ठरत आहे. ◆◆◆

# अश्रूपुराण



**दुःखाचा प्रसंग असो किंवा अत्यानंदाचा, आपल्या डोळ्यांतून आपोआप अश्रू बाहेर पडतात. माणसाच्या आयुष्यात अनेक वेळा अश्रू भाषेप्रमाणेदेखील काम करतात. जेव्हा आपण बोलून व्यक्त होऊ शकत नाही, तेव्हा आपले अश्रू आपल्या भावना प्रकट करतात. आपल्या डोळ्यांतून अश्रू का येतात, याचे वैज्ञानिक दृष्टिकोनातून असणारे कारण मात्र तितकेच खास आहे.**

अश्रू आपल्या डोळ्यांना ओलावा प्रदान करण्याचे काम करतात. त्यामुळे डोळे निरोगी आणि कार्यक्षम राहण्यास मदत होते. डोळ्यांतला ओलावा टिकवून ठेवण्यासाठी दररोज डोळ्यांमध्ये थोड्या प्रमाणात अश्रू निर्माण होणे फार महत्त्वाचे आहे. डोळ्यांना ओलसर ठेवणाऱ्या अश्रूंना 'बेसल टीअर्स' म्हणतात. हे अश्रू डोळ्यांचा पृष्ठभाग ओलसर ठेवतात आणि डोळ्यांना कोरडेपणाच्या समस्येपासून वाचवतात. हे अश्रू साधारणपणे डोळ्यांतून बाहेर पडत नाहीत. अश्रू निर्माण होण्याच्या प्रक्रियेमागे आपल्या डोळ्यांमध्ये असणाऱ्या 'लॅक्रिमल ग्रंथी' कार्य करत असतात. साधारणपणे एका दिवसात आपल्या डोळ्यांतून अर्ध्या चमच्याहून कमी अश्रू बाहेर पडतात. अश्रूंमध्ये पाण्याबरोबरच मीठ, तेल, म्युकस आणि काही जंतुनाशक रसायनंदेखील असतात. या रसायनांमुळे डोळ्यांना संसर्गापासून संरक्षण मिळतं. पापण्यांची उघडझाप झाल्यामुळे हे अश्रू डोळ्यांच्या पृष्ठभागावर सम प्रमाणात पसरतात. जेव्हा कांद्यातून निघणारे केमिकल्स, धूळ आणि धूर यांसारखे बाह्यघटक डोळ्यांत शिरतात तेव्हासुद्धा डोळ्यांतून अश्रू बाहेर पडतात. या अश्रूंना 'रिफ्लेक्स टीअर्स' म्हणतात. भावनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आपल्या शरीरातली हॉर्मोन्स महत्त्वाची भूमिका बजावतात. बाल्टिमोरमधल्या युनिव्हर्सिटी ऑफ मेरीलँडमधले मानसशास्त्रज्ञ रॉबर्ट प्रोव्हिन म्हणाले, की हसताना आणि रडताना मेंदूचा एकच भाग जास्त सक्रिय असतो. सतत हसण्याची किंवा रडण्याची क्रिया मेंदूच्या पेशींवर जास्त दबाव टाकते. अशा परिस्थितीत, कॉर्टिसोल आणि अ‍ॅड्रेनलिन नावाची स्ट्रेस हॉर्मोन्स शरीरात सक्रिय होतात. हसताना किंवा रडताना शरीरात होणाऱ्या असामान्य बदलांसाठी हे हॉर्मोन्स जबाबदार असतात. इमोशनल टीअर्स आणि रिफ्लेक्स टीअर्स हे दोन वेगळे प्रकार आहेत. जेव्हा आपण दुःख, आनंद किंवा भीती यांसारख्या भावना अनुभवतो तेव्हा डोळ्यांतून भावनिक (इमोशनल) अश्रू बाहेर पडतात. डोळ्यांत धूळ गेल्यास किंवा कांद्यातल्या केमिकल्समुळे रिफ्लेक्स अश्रू सोडले जातात. जेव्हा भावनिक अश्रू बाहेर पडतात तेव्हा डोळ्यांतून मोठ्या प्रमाणात पाणी बाहेर येतं. कधी-कधी हे अश्रू नाकातून पाण्याच्या रूपातही बाहेर पडतात. ●●●




काही रोजच्या गोष्टी आपण गृहितच धरत असतो व त्याविषयी फारसा विचार करत नाही. या जगात पाऊल ठेवल्यापासून आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत आपला श्वासोच्छ्वास अखंडपणे चालूच असतो. आपण दिवसभरात किती वेळा श्वास घेतो याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? माणूस दिवसातून अर्थात २४ तासांमध्ये किती वेळा श्वास घेतो, याबाबतही अनेकांना कुतूहल वाटू शकते.

शरीरशास्त्र आणि जीवशास्त्राच्या अभ्यासातून या प्रश्नाची उकल होते. श्वासोच्छ्वासाच्या प्रक्रियेशिवाय मानवाला जिवंत राहणंच अशक्य असते. याच प्रक्रियेतून शरीराला ऑक्सिजनचा पुरवठा केला जातो आणि यातून शरीरात आवश्यक ऊर्जेची निर्मितीसुद्धा होते. एखाद्या व्यक्तीच्या श्वसनक्रियेचा वेग त्याचे वय, आरोग्य आणि शरीरयष्टीवर आधारित असतो. सहसा एखादी सुदृढ, प्रौढ व्यक्ती मिनिटाला १२ ते २० वेळा श्वास घेते. याचाच अर्थ २४ तासांमध्ये ही व्यक्ती १७,००० ते २८,८०० वेळा श्वास घेते. श्वासोच्छ्वासाची ही आकडेवारी मोजणं अतिशय कठीण असून, हा आकडासुद्धा सरासरीच्याच हिशेबाने घेण्यात आला आहे. कोणा एका व्यक्तीला कोणतीही शारीरिक समस्या असल्यास त्या व्यक्तीची श्वसनप्रक्रिया सुदृढ व्यक्तीपेक्षा वेगळी असू शकते. दैनंदिन जीवनात आरोग्याचा समतोल राखण्यासाठी व्यायाम आणि संतुलित आहारासमवेत श्वसनक्रियेमध्ये कोणताही अडथळा न येणे ही बाबही तितकीच महत्त्वाची. ◆◆◆

## शैवालाचे जीवाश्मही ऊर्जादायी

बॅटरीची क्षमता वाढावी यासाठी वेगवेगळे प्रयोग केले जात असतात.

विशेषतः विजेवर चालणाऱ्या वाहनांसाठी बॅटरी बनवणे हे एक आव्हानात्मक काम असते. डायटमस या एकपेशीय शैवालाच्या जीवाश्मभूत अवशेषांपासून बनवलेल्या ॲनोडचा वापर केलेल्या सिलिकॉनच्या मदतीने विद्युत वाहनांना वीज पुरवठा करणाऱ्या किफायतशीर लिथियम आयन बॅटरी वैज्ञानिक विकसित करीत आहेत. रिव्हरसाईड येथील कॅलिफोर्निया विद्यापीठात याबाबत संशोधन झाले असून याच्या आधारे विद्युत वाहने व पोर्टेबल इलेक्ट्रॉनिक साधनात वापरता येणाऱ्या लिथियम आयन बॅटरी किफायतशीर दरात तयार करता येणार आहेत. लिथियम आयन बॅटरीज या रिचार्जेबल बॅटरीजमध्ये सर्वात लोकप्रिय आहेत त्यात ॲनोड, कॅथोड व इलेक्ट्रोलाईट असे घटक असतात. ते लिथियम क्षार सेंद्रिय द्रावणात विरघळवून तयार केले जातात. ग्राफाईट हा ॲनोडसाठी चांगला पर्याय आहे पण त्याच्या काही मर्यादांमुळे वापर अवघड आहे.




पर्यायी सिलिकॉन दहा पट ऊर्जा साठवू शकतो पण त्याची कार्बरथर्मिक पद्धतीने निर्मिती महागात पडते. त्यामुळे डायटोमॅशियस अर्थ या शैवालाच्या जीवाश्माचा वापर यात करता येईल असे वैज्ञानिकांचे मत असून त्याची उपलब्धताही भरपूर आहे, खडकांमध्ये तो सापडतो, गेली काही लाख वर्षे तो जीवाश्म स्वरूपातील अवशेषात आहे. मॅग्नेशियोथर्मिक रिडक्शन पद्धतीने सिलिकॉन डायॉक्साईडच्या या स्रोताचे सिलिकॉन नॅनो कणात रूपांतर करण्यात आले. आमच्या संशोधनानुसार डायअ‍ॅटम पेशी भित्तिका म्हणजे फ्रॅस्टुल्सच्या मदतीने सच्छिद्र ॲनोड तयार करता येतो असे कॅलिफोर्निया विद्यापीठाचे सेनगिझ ओझकान यांनी सांगितले. याच विद्यापीठातील मिहरी ओझकान व सेंगीझ यांनी लिथियम आयन बॅटरीचे ॲनोड पर्यावरण स्नेही व किफायतशीर पद्धतीने बनवण्यावर संशोधन केले आहे. ●●●



## हसण्याचा असाही फायदा

हसणे ही आपल्याला निसर्गाने दिलेली अनमोल देणगी आहे. हसण्याने मनावरील ताण दूर होतो आणि शारीरिक-मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी मदत होते हे आपल्याला माहिती आहेच. हल्ली तर हास्य क्लब, हास्य योग व हास्य थेरेपीही पाहायला मिळत असतात. 'हसताय ना... हसायलाच पाहिजे...' हा डायलॉग आपण सतत कॉमेडी शो च्या माध्यमातूनही टीव्हीवर ऐकत असतो, पण हे खरंच आहे. आता एका नव्या संशोधनात आढळले आहे की हसण्याचा लाभ डोळ्यांनाही होतो. हसण्यामुळे कोरड्या डोळ्यांची समस्याही दूर होण्यास मदत होते असे दिसून आले आहे.

शास्त्रज्ञांनी कोरड्या डोळ्यांच्या समस्येवर हा एक नैसर्गिक आणि मस्त उपाय शोधला आहे. एका संशोधनातून असे समोर आले आहे की, कोरड्या डोळ्यांची समस्या मोठ्याने हसल्याने बरे होऊ शकते. ही चाचणी यशस्वी ठरली आहे. याचा अर्थ कोरड्या डोळ्यांसाठी महागडे आयड्रॉप्सच्या ऐवजी हास्य थेरपी हे सर्वोत्तम औषध ठरू शकते. लंडनमधील शास्त्रज्ञांनी हे संशोधन केले आहे. जगातील सुमारे ३६ कोटी लोक ड्राय आय सिंड्रोमने ग्रस्त आहेत, त्यामुळे हे संशोधन करावे लागले. एकट्या ब्रिटनमध्ये सातपैकी एका व्यक्तीला डोळ्यांच्या समस्येने ग्रासले आहे. या समस्यांमध्ये डोळ्यांना खाज सुटणे आणि लाल होणे यांचा समावेश होतो. संशोधकांच्या मते, जे लोक सतत आयड्रॉप्स वापरतात, त्यांच्यासाठी हसणे हा एक नवीन उपाय आहे. यामुळे महागड्या उपचारांपासून परवडत नसलेल्या लोकांना दिलासा मिळेल. शास्त्रज्ञांनीही ही पद्धत एक उत्तम पर्याय मानली आहे. संशोधनासाठी वैज्ञानिकांनी दोन गट तयार केले होते, या गटांमध्ये चीन आणि ब्रिटनमधील लोकांचा समावेश होता. अभ्यासासाठी, एका गटात फक्त हसायला लावणारे व्यायाम केले गेले. तर दुसऱ्या गटावर डोळ्यातील औषधाचे थेंब टाकून उपचार करण्यात आले. दिवसातून चार वेळा या लोकांच्या डोळ्यात आय ड्रॉप्स टाकण्यात आले. हास्य गटात दिवसातून चार वेळा पाच मिनिटे हसायला लावले. हा सराव स्ला आठ आठवडे चालू ठेवला गेला आणि नंतर निकाल लागला, ज्यामध्ये हास्य थेरपी अधिक यशस्वी झाली! ●●●

## वस्त्रमहिमा

एकपेशीय सजीवापासून ते मानवाच्या उत्पत्तीपर्यंत निसर्गाला कोट्यवधी वर्षे लागली. मानवाची उत्क्रांती कशी झाली हे आपण सर्वांनीच शाळेत शिकले आहे. उत्क्रांतीच्या ओघात माकडासारखा प्राणी जन्माला आला. हा प्राणी 'एप' म्हणून ओळखला जात असे. त्याला शेपूट नव्हते. त्याचे डोके माकडापेक्षाही मोठे होते. त्याच्या पाठीत बाक होता आणि हा प्राणी दोन पायांवर चालत असे. त्याचे हात गुडघ्यापर्यंत लांब होते. त्याच्या भुवयावर जाड केस होते व संपूर्ण शरीरभर केस होते. हा प्राणी म्हणजेच आदिमानव. त्यानंतरच्या काळात आदिमानवाची उत्क्रांती होऊन त्याचा मानव झाला. होमो इरेक्टस (पाठीचा कणा ताठ ठेवून चालणारा मानव) आणि होमो सेपिअन (बुद्धिमान मनुष्य) असे मानवाच्या उत्क्रांतीचे २ महत्त्वाचे टप्पे मानले जातात. होमो सेपिअननंतर मानवाची प्रगती होत गेली. आधी मानव हा झाडांची पाने आणि प्राण्यांची कातडी याने आपले शरीर झाकत होता; मात्र मानवाने कपडे घालणे केव्हापासून सुरू केले? या प्रश्नामागे १,७०,००० वर्षे जुना इतिहास आहे.



अतिप्राचीन काळात मानव प्राण्यांची कातडी आणि झाडांची साल यांनी आपला देह झाकत होता. सध्या वस्त्र किंवा कापड है मानवाच्या आवश्यक गरजांपैकी एक आहे. अगदी राजे महाराजांच्या काळापासून वस्त्र हे स्टेटस सिम्बॉल मानले जातात. आदिमानवाने पहिले वस्त्र केव्हापासून वापरायला सुरुवात केली याचा शोध घेतला असता यामागे १७०,००० वर्षे जुना इतिहास सापडतो. मानवाने हिमयुगानंतर प्रथम कपडे घातले, असे देखील काही संशोधक सांगतात. मानवाने कपडे घालण्यास कधीपासून सुरुवात केली याचा शोध घेण्यासाठी संशोधकांनी चक्क उवांचा अभ्यास केला. मॉलेक्युलर बायोलॉजी अँड इव्होल्युशन या नियतकालिकात हे संशोधन प्रकाशित करण्यात आले. यासाठी उवांच्या डीएनएचा अभ्यास करण्यात आला. यासाठी केसांतील उवांचे निरीक्षण करण्यात आले. यानंतर कपड्यांवर असलेल्या उवांचा अभ्यास करण्यात आला. साधारण १ लाख ७० हजार वर्षांपूर्वी मानवाच्या कपड्यांमध्ये उवांचे अवशेष सापडले. यावरून १ लाख ७० हजार वर्षांपूर्वी मानवाने प्रथम कपडे परिधान करायला सुरुवात केली असावी, असा दावा अभ्यासकांनी केला आहे. ◆◆◆

## डॉल्फिनचीही असते बोलीभाषा

भाषा हे संवादाचे एक महत्त्वाचे माध्यम आहे. माणूस वेगवेगळ्या भाषांमधून परस्परांशी संवाद साधत असतो, विचारांची देवाणघेवाण करीत असतो. मात्र पशुपक्ष्यांमध्येही असे असते का हा एक अतिशय जुन्या काळापासूनचा संशोधनाचा विषय आहे. डॉल्फिन माशांनाही बोलीभाषा असते, असा दावा संशोधकांनी केलेला आहे. दोन डॉल्फिनमधील संभाषण वैज्ञानिकांनी ध्वनिमुद्रित केले होते. काळ्या समुद्रातील दोन बॉटल नोज डॉल्फिन्समधील हे संभाषण असून त्या माशांची नावे यशा व याना अशी आहेत. त्यांचे संभाषण ध्वनिमुद्रित करताना वैज्ञानिकांनी ते विचलित होणार नाहीत याची काळजी घेतली. काही स्पंदनांच्या मदतीने ते शब्द व वाक्ये तयार करतात असे व्याचेस्लाव रायबोव यांनी म्हटले होते.

दोन व्यक्तींमध्ये जसे संभाषण होते तसेच या दोन माशांमध्ये झाले असे त्यांनी सांगितले. ऑस्ट्रेलियातील मरडॉक विद्यापीठाचे जोशुआ स्मिथ यांनी सांगितले की, डॉल्फिनमध्ये संभाषण होते हे सिद्ध करण्यासाठी आणखी संशोधनाची गरज आहे. सध्या तरी असा ठाम निष्कर्ष काढता येणार नाही. माशांचे संदेश हे माणसांसारखेच संदर्भ असलेले असतात. डॉल्फिन त्यासाठी दोन प्रकारांच्या आवाजांचा वापर करत असतात. व्हिसल व क्लिक अशी दोन प्रकारची स्पंदने त्यात असतात.



रायबोव यांनी काही स्पंदने वेगळी काढली व त्यातून माशांनाही स्पंदनांची भाषा असते त्यातून ते वाक्ये व शब्द तयार करतात असे म्हटले आहे. यात मानवी बोली भाषेतील सर्व वैशिष्ट्ये दिसून येतात. याचा अर्थ डॉल्फिन्सची बुद्धिमत्ता खूप जास्त असते, असे सेंट पीटर्सबर्ग पॉलिटेक्निकल युनिव्हर्सिटी जर्नल-फिजिक्स अँड मॅथेमेटिक्स या नियतकालिकात म्हटले आहे. त्यांची भाषा जास्त प्रगत आहे असे सांगून रायबोव म्हणतात की, यातून माणूस असे उपकरण तयार करू शकतो ज्याच्या मदतीने डॉल्फिनशी संवाद साधता येईल. माणसांनी प्रथम पृथ्वीवरील पहिल्या बुद्धिमान प्राण्यांशी संपर्क केला पाहिजे तो डॉल्फिन व माणसाच्या संपर्कातून शक्य आहे. स्मिथ यांच्या मते डॉल्फिनचे संदेशवहन किंवा संवाद हा नवीन विषय आहे व त्यात आणखी संशोधनाची गरज आहे. ●●●

## कॅस्पियन सागर लुप्त होणार?

जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलाचा विपरित परिणाम जगभरात अनुभवायला मिळत आहेत. यामुळे अनेक देशांना नैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागत आहे. तसेच जलस्रोतांवर देखील या गोष्टींचा परिणाम पाहायला मिळत आहे. जगातील सर्वात मोठा तलाव या कारणांमुळे आकुंचन पावत असल्याने शास्त्रज्ञ चिंतेत आहेत.

कॅस्पियन सागर हा जगातील खाऱ्या पाण्याचा सर्वात मोठा तलाव मानला जातो. चार लाख चौरस मैल म्हणजेच दहा लाख चौरस किलोमीटर क्षेत्र असलेल्या या तलावाची जगभरात चर्चा आहे. या तलावाचा आकार हा युरोपातील जर्मनी या देशापेक्षाही मोठा आहे. या तलावावर कझाकिस्तान, इराण, अझरबैजान, रशिया आणि तुर्कमेनिस्तान यासारखे देश अवलंबून आहेत. हा तलाव सतत आकुंचन पावत असल्याने भविष्यात खूप मोठ्या लोकसंख्येला धोका निर्माण होऊ शकतो. हवामान बदल, मानवी हस्तक्षेप आणि या सरोवराच्या महत्त्वाबाबत शास्त्रज्ञ खूप चिंतेत आहेत. तलावाच्या किनाऱ्यावर वसलेल्या मानवी वसाहती मासेमारी, शेती, पर्यटन, पिण्याच्या पाण्यासह इंधन आणि गॅस साठ्यासाठी यावर अवलंबून आहेत. तसेच कॅस्पियन सागर या भागातील कोरड्या हवामानावर नियंत्रण ठेवण्यास मदत करतो. त्यामुळे मध्य आशियात पाऊस पडतो आणि हवामान संतुलित राहते. पण या तलावाची घटत असलेली पाणीपातळी शास्त्रज्ञांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे.

एकीकडे हवामान बदलामुळे हिमखंड वितळत असल्याने जगभरातील सर्व समुद्रांमधील पाणीपातळी वाढत आहे. मात्र दुसरीकडे लँड लॉक्ड समुद्र आणि तलावांना धोका निर्माण होत आहे. हा तलाव पाऊस आणि नदीच्या पाण्यावर अवलंबून असतो. पण धरणं, जास्त पाणीसाठा, खनिज उत्खनन, प्रदूषण आणि वाढत्या मानव निर्मित हवामान संकटामुळे हा तलाव आकुंचन पावत आहे. आता कॅस्पियन सागरची स्थिती अशी झालीय की तो पुन्हा पूर्ववत होणे किंवा मूळ स्वरूपात येणे अवघड आहे, अशी भीती शास्त्रज्ञांना वाटते. त्यांचा हा दृष्टिकोन बऱ्याच अंशी योग्य आहे. कारण कझाकिस्तान आणि उज्बेकिस्तान दरम्यान विस्तारलेला अरल सागर हा कधीकाळी जगातील सर्वात मोठा तलाव होता, पण वाढता मानवी हस्तक्षेप आणि हवामान बदलांमुळे तो हळूहळू लुप्त झाला. हा प्रकार कॅस्पियन सागराच्या बाबतीत देखील घडू शकतो. या तलावाला मिळणाऱ्या नद्यांवर असलेली धरणे आणि तेल रिफायनरीमधून कच्चे तेल काढणे या गोष्टींचा विपरित परिणाम या तलावावर होत आहे. ●●●



